# श्री स्वामी चरित्र सारामृत

सद्‌गुरू श्री स्वामी समर्थ सेवाभावी संस्था डोंबिवली (प.)
रजि. ई २३६७ दि. ०३/०४/२००१

**प्रकाशक** : सद्गुरू श्री स्वामी समर्थ सेवाभावी संस्था डोंबिवली (प.)
रजि. ई २३६७ दि. ०३/०४/२००१

**पत्ता** : श्री नाना महाराज को-ऑ. हा. सो.
कै. हिरा नागो जोशी मार्ग, संतोषीमाता मंदीरासमोर,
कोपर क्रॉस रोड, डोंबिवली (पश्चिम) - ४२१ २०२.

**मुद्रक** : सुंदरम आर्ट प्रिंटींग प्रेस
१२, वडाळा उद्योग भवन, नायगाव क्रॉस रोड,
वडाळा, मुंबई - ४०० ०३१.

**अक्षर जुळणी** : साईनाथ ग्राफिक्स
१०१, श्रीधर अपार्टमेंट, फडके क्रॉस रोड,
डोंबिवली (पूर्व) ४२१ २०१.

**देणगी मूल्य** : तीस रूपये

# ।। प्रथमोऽध्यायः ।।

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरूभ्यो नमः । श्रीकुलदेवतायै नमः । श्री अक्कलकोटनिवासी - पूर्णदत्तावतार - दिगंबर - यतिवर्य स्वामिराजाय नमः ।।

ॐ रक्तांङ्ग, रक्तवर्ण, पद्मनेत्र, सुहास्यवदनं, कंथा-टोपी-च-माला दण्डकमण्डलुधर, कट्यांकर रक्षक, त्रैगुण्यरहित त्रैलोक्यपालक, विश्वनायक भक्तवत्सल, कलियुगे, श्री स्वामीसमर्थावतारधारक पाहि माम् ।।

श्लोक-ब्रम्हानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिं । द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्वमस्यादिलक्ष्यम् । एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षिभूतं । भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरूं तं नमामि ।।

जयजय श्रीजगरक्षका । जयजयाजी भक्तपालका । जयजय कलिमल नाशका । अनादिसिध्दा जगद्‌गुरू ।।१।। जयजय क्षीरसागरविलासा । मायाचक्रचालका अविनाशा । शेषशयना अनंतवेषा । अनामातीता अनंता ।।२।। जयजयाजी गरूडवाहना । जयजयाजी कमललोचना । जयजयाजी पतीतपावना । रमारमणा विश्वेशा ।।३।। मेघवर्ण आकार शांत । मस्तकीं किरीट विराजित । तोचि स्वयंभू आदित्य । तेज वर्णिले न जाय ।।४।। विशाळ भाळ आकर्ण नयन ।। सरळ नासिका सुहास्य वदन । दंतपंक्ति कुंदकळ्यांसमान । शुभ्रवर्ण विराजती ।।५।। रत्नमाला हृदयावरी । जे कोटी सूर्यांचे तेज हरी । हेममय भूषणें साजिरीं । कौस्तुभमणि विशेष ।।६।। वत्सलांच्छनाचे भूषण । तेचि प्रेमळ भक्तीची खूण । उदरी त्रिवळी शोभायमान । त्रिवेणीसंगमासारखी ।।७।। नाभिकमल सुंदर अति । जेथे विधात्याची उत्पत्ती । की चराचरा जन्मदाती । मूळ जननी तेचि पैं ।।८।। जानुपर्यंत कर शोभती । मनगटी कंकणें विराजती । करकमलांची आकृति । रक्त पंकजासमान ।।९।। भक्तां द्यावया अभय वर । सिध्द सर्वदा सव्य कर । गदा

पद्म शंख चक्र । चार हस्तीं आयुधें ।।१०।। कांसे कसिला पीतांबर । विद्युल्लतेसम तेज अपार । कर्दळीस्तंभापरि सुंदर । उभय जंघा दिसताती ।।११।। जेथें भक्त जन सुखावती । ज्याच्या दर्शनें पतित तरती । ज्यातें अहोरात्र ध्याती । नारदादि ऋषिवर्य ।।१२।। ज्यातें कमला करें चुरीत । संध्यारागासमान रक्त । तळवे योग्य चिन्हें मंडित । वर्णितां वेद शीणले ।।१३।। चौदा विद्या चौसष्ट कला । ज्यातें वर्णितां थकल्या सकळा । ऐशा त्या परम मंगला । अल्पमती केविं वर्णू ।।१४।। नारदादि मुनीश्वर । व्यास वाल्मीकादि कविवर । क्रमूं न शकले महिमांबर । तेथें पामर मी काय ।।१५।। जो सकळ विश्वाचा जनिता । समुद्रकन्या ज्याची कांता । जो सर्व कारण कर्ता । ग्रंथारंभी नमूं तया ।।१६।। त्या महाविष्णुचा अवतार । गजवदन शिवकुमर । एकदंत फरशधर । अगम्य लीला जयाची ।।१७।। जो सकळ विद्यांचा सागर । चौसष्ट कलांचे माहेर । ऋध्दिसिध्दीचा दातार । भक्तपालक दयाळू ।।१८।। मंगल कार्यीं करितां स्मरण । विघ्नें जाती निरसोन । भजकां होई दिव्य ज्ञान । वेदांतसार कळें पां ।।१९।। सकल कार्यारंभी जाणा । करिती

ज्याच्या नामस्मरणा । ज्याच्या वरप्रसादें नाना । ग्रंथ रचना करिती कवी ।।२०।। तया मंगलासी साष्टांग नमन । करूनी मागे वरदान । स्वामीचरित्र सारामृत पूर्ण । निर्विघ्नपणे होवो हे ।।२१।। जीचा वरप्रसाद मिळतां । मूढ पंडित होती तत्वतां । सकळ काव्यार्थ येत हाता । ती ब्रह्मसुता नमियेली ।।२२।। मूढमती मी अज्ञान । काव्यादिकांचे नसे ज्ञान । माते तूं प्रसन्न होवोन । ग्रंथरचना करवावी ।।२३।। जो अज्ञानतिमिरनाशक । अविद्याकाननच्छेदक । जो सद्बुध्दीचा प्रकाशक । विद्यादायक गुरूवर्य ।।२४।। ज्याचिया कृपेंकरोन । सच्छिष्या लाधे दिव्यज्ञान । तेणेंच जगीं मानवपण । येतसे कीं निश्चयें ।।२५।। तेवीं असती मातापितर । तैसेचि श्रेष्ठ गुरूवर्य । चरणीं त्यांचिया नमस्कार । वारंवार साष्टांग ।।२६।। मी मतिमंद अज्ञ बाळ । घेतली असे थोर आळ । ती पुरविणार दयाळ । सद्गुरूराज आपणची ।।२७।। नवमास उदरीं पाळिलें । प्रसववेदनांते सोशिलें । कौतुकें करूनी वाढविलें । रक्षियले आजवरी ।।२८।। जननीजनका समान । अन्य दैवत आहे कोण । वारंवार साष्टांग नमन । चरणीं तयांच्या करीतसे ।।२९।। ब्रह्मा विष्णु

महेश्वर । तिन्ही देवांचा अवतार । लीलाविग्रही अत्रिकुमर । दत्तात्रय नमियेला ।।३०।। तीन मुखें सहा हात । गळां पुष्पमाळा शोभत । कर्णी कुंडले तेज अमित । विद्युल्लतेसमान ।।३१।। कामधेनु असोनी जवळी । हातीं धरिली असे झोळी । जो पाहतां एका स्थळीं । कोणासही दिसेना ।।३२।। चार वेद होऊनी श्वान । वसती समीप रात्रंदिन । ज्याचे त्रिभुवनीं गमन । मनोवेगें जात जो ।।३३।। त्या परब्रह्मासी नमन । करोनि मागे वरदान । स्वामीचरित्रसारामृत पूर्ण । होवो कृपेनें आपुल्या ।।३४।। वाढला कलीचा प्रताप । करूं लागले लोक पाप । पावली भूमि संताप । धर्मभ्रष्ट लोक बहु ।।३५।। पहा कैसें दैव विचित्र । आर्यावर्ती आर्यपुत्र । वैभवहीन झाले अपार । दारिद्रय दुःखे भोगिती ।।३६।। शिथिल झाली धर्मबंधनें । नास्तिक न मानिती वेदवचनें । दिवसेंदिवस होमहवनें । कमी होऊं लागलीं ।।३७।। सुटला धर्माचा राजाश्रय । अधर्मप्रवर्तकां नाहीं भय । उत्तरोत्तर नास्तिकमय । भरतखंड जाहलें ।।३८।। नाना विद्या आणि कला । अस्तालागीं गेल्या सकला । ऐहिक भोगेच्छा बळावल्या । तेणें सुटला परमार्थ ।।३९।।

धर्मसंस्थापने कारणें । युगायुगीं अवतार घेणें । नानाविध वेष नटणें । जगत्पतीचें कर्तव्य ।।४०।। लोक बहू भ्रष्ट झाले । स्वधर्मातें विसरले । नास्तिकमतवादी मातले । आर्यधर्माविरूध्द ।।४१।। मग घेतसे अवतार । प्रत्यक्ष जो कां अत्रिकुमर । अक्कलकोटीं साचार । प्रसिध्द झाला स्वामीरूपें ।।४२।। कोठें आणि कोणत्या काळीं । कोण्या जातींत कोणत्या कुळीं । कोण वर्णाश्रम धर्म मुळीं । कोणासही कळेना ।।४३।। ते स्वामी नामें महासिध्द । अक्कलकोटीं झाले प्रसिध्द । चमत्कार दाविले नानाविध । भक्त मनोरथ पुरविले ।।४४।। त्यांसी साष्टांग नमोनी । करी प्रार्थना कर जोडोनी । आपुला विख्यात महिमा जनीं । गावयाचें योजिलें ।।४५।। तुमचें चरित्र महासागर । पावेन कैसा पैलतीर । परी आत्मसार्थक करावया साचार । मीन तेथें जाहलों ।।४६।। किंवा अफाट गगनासमान । अगाध आपुलें महिमान । अल्पमती मी अज्ञान । आक्रमण केवीं करूं ।।४७।। पिपीलिका म्हणे गिरीसी । उचलून घालीन काखेंसी । किंवा खद्योत सूर्यासी । लोपवीन म्हणे स्वतेजें ।।४८।। तैसी असे माझी आळ । बाळ जाणुनी लडिवाळ । पुरविता तूं दयाळ । दीनबंधू

यतिवर्या ।।४९।। कर्ता आणि करविता । तूंची एक स्वामीनाथा । माझिया ठाई वार्ता । मीपणाची नसेची ।।५०।। ऐसी ऐकुनियां स्तुती । संतोषली स्वामिराजमूर्ति । कविलागीं अभय देती । वरद हस्तें करोनी ।।५१।। उणें न पडे ग्रंथात । सफल होतील मनोरथ । पाहुनी आर्यजन समस्त । संतोषतील निश्चये ।।५२।। ऐसी ऐकोनी अभयवाणी । संतोष झाला माझिया मनीं । यशस्वी होवोनी लेखणी । ग्रंथ समाप्तीप्रति पावो ।।५३।। आतां नमूं साधुवृंद । ज्यांसी नाहीं भेदाभेद । जे स्वात्मसुखीं आनंदमय । सदोदित राहती ।।५४।। मग नमिले कवीश्वर । जे शब्दसृष्टीचे ईश्वर । ज्यांची काव्ये सर्वत्र । प्रसिध्द असती या लोकीं ।।५५।। व्यास वाल्मिक महाज्ञानी । बहुत ग्रंथ रचिले ज्यांनीं । वारंवार तयांच्या चरणीं । नमन माझे साष्टांग ।।५६।। कविकुलमुकुटावतंस । नमिले कवि कालिदास । ज्यांची नाट्यरचना विशेष । प्रिय जगीं जाहली ।।५७।। श्रीधर आणि वामन । ज्यांची ग्रंथरचना पाहोन । ज्ञातेही डोलविती मान । तयांचे चरण नमियेले ।।५८।। ईशचरणीं जडलें चित्त । ऐसे तुकारामादिक भक्त । ग्रंथारंभी

तया नमित । वरप्रसादाकारणे ।।५९।। अहो तुम्ही संत जनीं । मज दीनावरी कृपा करोनी । आपण हृदयस्थ राहोनी । ग्रंथरचना करवावी ।।६०।। आतां करू नमन । जे कां श्रोते विचक्षण । महाज्ञानी आणि विद्वान । श्रवणी सादर बैसले ।।६१।। महापंडित आणि चतुर । ऐसा श्रोतृसमाज थोर । मतिमंद मी त्यांच्यासमोर । आपलें कवित्व केवीं आणूं ।।६२।। परी थोरांचें लक्षण । एक मला ठाऊकें पूर्ण । काहीं असतां सद्गुण । आदर करिती तयाचा ।।६३।। संस्कृताचा नसे गंध । मराठीही न ये शुध्द । नाही पढलों शास्त्रछंद । कवित्वशक्ति अंगी नसे ।।६४।। परी हें अमृत जाणोनी । आदर धरावा जी श्रवणीं । असे माझी असंस्कृत वाणी । तियेकडे न पहावें ।।६५।। न पहातां जी अवगुण । ग्राह्य तितुकेंच घ्यावें पूर्ण । एवढी विनंती कर जोडोन । चरणीं आपुल्या करीतसे ।।६६।। स्वामींच्या लीला बहुत । असती प्रसिध्द लोकांत । त्या सर्व वर्णितां ग्रंथ । पसरेल समुद्रसा ।।६७।। त्या महोदधींतुनी पाही । अमोल मुक्ताफळें घेतलीं काहीं । द्यावया मान सुज्ञांहीं । अनमान कांही न करावा ।।६८।। कीं हे उद्यान विस्तीर्ण ।

तयामाजी प्रवेश करोन । सुंदर कुसुमें निवडोन । हार त्यांचा गुंफिला ।।६९।। कवि होवोनियां माळी । घाली श्रोत्यांच्या गळीं । उभा ठाकोनि बध्दांजुळी । करी प्रार्थना सप्रेमें ।।७०।। अहो या पुष्पांचा सुवास । तृप्त करील आपुलें मानस । हा सुगंध नावडे जयास । तेची पूर्ण अभागी ।।७१।। आतां असोत हे बोल । पुढें कथा बहु अमोल । वदविता स्वामी दयाळ । निमित्त मात्र विष्णुकवि ।।७२।। वैराग्यें प्रत्यक्ष शंकर । तेजें जैसा सहस्त्रकर । दुष्टा केवळ सूर्यपुत्र । भक्तां मातेसमान ।।७३।। यतिराजपदकल्हार । विष्णुकवि होऊन भ्रमर । ज्ञानमधुस्तव साचार । रूंजी तेथें घालीतसे ।।७४।। स्वामीचरित्रसारामृत । नाना प्राकृत कथासंमत । आदरें भक्त परिसोत । प्रथमोऽध्याय गोड हा ।।७५।। श्रीशंकरार्पणमस्तु श्रीश्रीपादश्रीवल्लभार्पणमस्तु । इति श्रीस्वामीचरित्रसारामृते मंगलाचरणं नाम प्रथमोऽध्यायः ।।१।।

# ।। द्वितीयोऽध्यायः ।।

श्रीगणेशाय नमः ।। कामना धरोनि जे भजती । होय त्यांची मनोरथ पूर्ति । तैसेंचि निष्काम भक्तांप्रती । कैवल्यप्राप्ति होतसे ।।१।। नृसिंहसरस्वती प्रगट झाले । अगणित पापी तारिले । कर्दळीवनीं गुप्त जहाले । गुरूचरित्रीं ती कथा ।।२।। पुढें लोकोध्दाराकारणें । भाग पडलें प्रगट होणें । धुंडिलीं बहुत पट्टणें । तेची स्वामी यतिवर्य ।।३।। स्वामींची जन्मपत्रिका । एका भक्तें केली देखा । परी तिजविषयीं शंका । मनामाजी येतसे ।।४।। गुरूराज गुप्त झाले । स्वामीरूपें प्रगटले । त्यांचे शकप्रमाण न मिळे । म्हणोनी शंका पत्रिकेची ।।५।। ते केवळ अनादिसिध्द । खुंटला येथें पत्रिकावाद । लोकोध्दारासाठीं प्रसिध्द । मानवरूपें जाहले ।।६।। अक्कलकोटामाझारी । राचपा मोदी याचे घरीं । बैसली समर्थांची स्वारी । भक्त मंडळी वेष्टित ।।७।। साहेब कोणी कलकत्त्याचा । हेतु धरोनी दर्शनाचा । पातला त्याच दिवशीं साचा । आदर तयाचा केला कीं ।।८।। त्याजसवें एक पारसी ।

आला होता दर्शनासी । ते येण्यापूर्वी मंडळीसी । महाराजांनी सुचविलें ।।९।। तीन खुर्च्या आणोनी बाहेरी । मांडा म्हणती एके हारीं । दोघांसी बैसवोनी दोहोंवरीं । तिसरीवरी बैसले आपण ।।१०।। पाहोनी समर्थांचे तेज । उभयतांसी वाटले चोज । साहेबानें प्रश्न केला सहज । आपण आला कोठुनी ।।११।। स्वामींनी हास्यमुख करोनी । उत्तर दिलें तयालागोनी । आम्हीं कर्दलीवनांतुनी । प्रथमारंभी निघालो ।।१२।। मग पाहिलें कलकत्ता शहर । दुसरीं नगरें देखिलीं अपूर्व । बंगालदेश समग्र । आम्ही असे पाहिला ।।१३।। घेतलें कालीचें दर्शन । पाहिलें गंगातटाक पावन । नाना तीर्थें हिंडोन । हरिद्वाराप्रति गेलों ।।१४।। पुढें पाहिलें केदारेश्वर । हिंडलो तीर्थें समग्र । ऐशीं हजारो हजार । नगरें आम्ही देखिलीं ।।१५।। मग तेथुनी सहज गती । पातलों गोदातटाकाप्रति । जियेची महाप्रख्याती पुराणांतरीं वर्णिली ।।१६।। केले गोदावरी स्नान । स्थळें पाहिली परम पावन । कांहीं दिवस फिरोन । हैदराबादेसी पातलों ।।१७।। येऊनिया मंगळवेढ्यास । बहुत दिवस केला वास । मग येउनी पंढरपुरास । स्वेच्छेनें तेथें

राहिलो ।।१८।। तदनंतर बेगमपुर । पाहिलें आम्ही सुंदर । रमलें आमुचें अंतर । कांहीं दिवस राहिलों ।।१९।। तेथोनी स्वेच्छेनें केवळ । मग पाहिलें मोहोळ । देश हिंडोनी सकळ । सोलापुरी पातलों ।।२०।। तेथें आम्हीं कांहीं महिने । वास केला स्वेच्छेनें । अक्कलकोटाप्रति येणें । तेथोनिया जहालें ।।२१।। तैं पासुनी या नगरांत । आनंदें आहों नांदत । ऐसें आमुचे सकल वृत्त । असे मुळापासोनी ।।२२।। ऐकोनिया ऐशी वाणी । उभयतां संतोषले मनीं । मग स्वामिआज्ञा घेवोनी । गेले उठोनी उभयतां ।।२३।। द्वादश वर्षे मंगळवेढ्याप्रति । राहिले स्वामिराज यति । परी त्या स्थळीं प्रख्याती । विशेष त्यांची न जाहली ।।२४।। सदा वास अरण्यांत । बहुधा न येती गांवांत । जरी आलिया क्वचित । गलिच्छ जागीं बैसती ।।२५।। कोणी कांहीं आणोनि देती । तेंची महाराज भक्षिती । क्षणैक राहुनी मागुती । अरण्यांत जाती उठोनी ।।२६।। वेडा बुवा तयांप्रती । गांवांतील लोक म्हणती । कोणीही अज्ञानें नेणती । परब्रह्मरूप हें ।।२७।। त्या समयीं नामें दिगंबर । वृत्तीनें केवळ जे शंकर । तेव्हां तयांचा

अवतार । सोलापुरीं जाहला ।।२८।। तें जाणोनी अंतरखूण । स्वामींसी मानिती ईश्वर समान । परी दुसरे अज्ञ जन । वेडा म्हणोनी लेखिती ।।२९।। दर्शना येतां दिगंबर । लीलाविग्रही यतिवर्य । कंबरेवरी ठेऊनी कर । दर्शन देती तयांसी ।।३०।। अमृतासमान पुढें कथा । ऐकतां पावन श्रोता वक्ता । स्वामी समर्थ वदविता । ज्याची सत्ता सर्वत्र ।।३१।। अहो हे स्वामीचरित्र । भरला असे क्षीरसागर । मुक्त करोनी श्रवणद्वार । प्राशन करा श्रोते हो ।।३२।। तुम्हां नसावा येथें वीट । सर्वदा सेवावें आकंठ । भवभयाचें अरिष्ट । तेणें चुके विष्णु म्हणे ।।३३।। स्वामी चरित्रसारामृत । नाना प्राकृत कथासंमत । आनंदे भक्त परिसोत । द्वितीयोऽध्याय गोड हा ।।३४।। इति श्रीस्वामीचरित्रसारामृते द्वितीयोऽध्यायः । श्रीरस्तु । शुभमस्तु ।

# ।। तृतीयोऽध्यायः ।।

श्रीगणेशाय नमः । धन्य धन्य ते या जगतीं । स्वामीचरणीं ज्यांची भक्ती । त्यांसी नाहीं पुनरावृत्ती । पद पावती कैवल्य ।।१।। गताध्यायीं कथा सुंदर । स्वामींनीं निवेदिले स्वचरित्र । आणि बाबा दिगंबर । त्यांचें वृत्त निवेदिलें ।।२।। निर्विकार स्वामिमूर्ती । लोकां चमत्कार दाविती । कांही वर्षे करोनी वस्ती । मंगळवेढें सोडिलें ।।३।। मोहोळामाजी वास्तव्य करीत । अप्पा टोळ झाले भक्त । तेथींचें साकल्य वृत्त । अल्पमती केवीं वर्णूं ।।४।। स्वामीचरित्राचें हें सार । म्हणूनी केला नाहीं विस्तार । वर्णिता कथा समग्र । ग्रंथ पसरे उद्धीसम ।।५।। सवे घेऊनी स्वामींसी । टोळ जाती अक्कलकोटासी । अर्धमार्गावरूनी टोळांसी । मागें परतणें भाग पडे ।।६।। टोळें आज्ञापिलें सेवकां । जोंवरी आम्हीं येउ का । तोंवरी स्वामींसी सोडूं नका । येथेंच मुक्काम करावा ।।७।। टोळ गेलिया परतोनी । स्वामी चालले उठोनी । बहुत वर्जिलें सेवकांनी । परी नच मानिलें त्यां ।।८।। तेथोनिया निघाले

अक्कलकोटाप्रति आले । ग्रामद्वारीं बैसले । यतिराज स्वेच्छेनें ।।९।। तेथें एक अविंध होता । तो करी तयांची थट्टा । परी कांहीं चमत्कार पाहतां । महासिध्द समजला ।।१०।। पूर्वपुण्यास्तव निश्चिती । आले चोळाप्पाचें गृहाप्रती । स्वामीसी जाणोनी ईश्वरमूर्ती । चोळाप्पा करी आदर ।।११।। चोळाप्पाचें भाग्य उदेलें । यतिराज गृहासी आले । जैसी कामधेनू आपण बळें । दरिद्रियाच्या घरीं जाय ।।१२।। पूर्वपुण्य होतें गांठी । म्हणूनी घडल्या या गोष्टी । झाली स्वामीराज भेटी । परम भाग्य तयांचें ।।१३।। धन्य धन्य तयाचें सदन । जें स्वामींचे वास्तव्यस्थान । सुरवरां जे दुर्लभ चरण । तयाच्या घरीं लागले ।।१४।। योगाभ्यासी योग साधिती । तडी तापडी मार्गी श्रमती । निराहार कितीक राहती । मौन धरिती कितीएक ।।१५।। एका चरणीं उभे राहोन । सदा विलोकिती गगन । एक गिरिगव्हरीं बैसोन । तपश्चर्या करिताती ।।१६।। एक पंचाग्निसाधन करिती । एक पवनातें भक्षिती । कित्येक संन्यासी होती । संसार अवघा सांडोनी ।।१७।। एक करिती कीर्तन । एक मांडिती पूजन । एक करिती होमहवन । एक षट्कर्मे

आचरिती ।।१८।। एक लोकां उपदेशिती । एक भजनामाजी नाचती । एक ब्राह्मणभोजन करिती । एक बांधिती देवालयें ।।१९।। परी जयाचे चरण । दुर्लभ सद्‌भक्तीवांचोन । केलियासी नाना साधन । भावाविण सर्व व्यर्थ ।।२०।। योगयागादिक कांही । चोळाप्पानें केलें नाहीं । परी भक्तिस्तव पाहीं । स्वामी आले सदनातें ।।२१।। तयाची देखोनिया भक्ती । स्वामी तेथें भोजन करिती । तेव्हां चोळाप्पाचे चित्तीं । आनंद झाला बहुसाळ ।।२२।। तैंपासुनी तयांचे घरीं । राहिले स्वामी अवतारी । दिवसेंदिवस चाकरी । चोळाप्पा करी अधिकाधिक ।।२३।। तेव्हां राज्यपदाधिकारी । मालोजीराजे गादीवरी । दक्ष असोनी कारभारीं । परम ज्ञानी असती जे ।।२४।। अक्कलकोटाची प्रख्याती । तेव्हां कांही विशेष नव्हती । परी तयाचें भाग्य निश्चिती । स्वामीचरणीं उदेलें ।।२५।। तैंपासुनी जगांत । तया नगराचें नांव गाजत । अप्रसिध्द ते प्रख्यात । कितीएक जाहले ।।२६।। चोळाप्पाचे गृहाप्रती । आले कोणीएक यती । लोकां चमत्कार दाविती । गावांत मात पसरली ।।२७।। आपुली व्हावी प्रख्याती । ऐसें नाही जयांचे चित्ती । म्हणूनिया

स्वामिराज यती । बहुधा न जाती फिरावया ।।२८।। लोकांमाजी पसरली मात । नृपासी कळला वृत्तांत । कीं आपुलिया नगरांत । यति विख्यात पातले ।।२९।। रहाती चोळाप्पाचे घरीं । दर्शना जाती नरनारी । असती केवळ अवतारी । लीला ज्यांची विचित्र ।।३०।। वार्ता ऐसी ऐकोनी । राव बोलला काय वाणी । गांवांत यती येवोनी । फार दिवस जाहले ।।३१।। परी आम्हां श्रुत पाहीं । आजवरी जाहलें नाहीं । आता जावोनी लवलाही । भेटूं तया यतिवर्या ।।३२।। परी ते केवळ अंतर्ज्ञानी । ऐसी वार्ता ऐकिली कानीं । हें सत्य तरी येवोनी । आतांच देती दर्शना ।।३३।। रावमुखांतुनी वाणी निघाली । तोंचि यतिमूर्ती पुढें ठेली । सकल सभा चकित झाली । मती गुंगली रायाची ।।३४।। सिंहासनाखालीं उतरोन । राव घाली लोटांगण । प्रेमाश्रुंनीं भरले नयन । कंठ झाला सद्‌गदित ।।३५।। दृढ घातली मिठी चरणीं । चरण धुतले नेत्राश्रुंनी । मग तयां हस्तकीं धरोनी । आसनावरी बैसविलें ।।३६।। खूण पटली अंतरीं । स्वामी केवळ अवतारी । अभक्ती पळोनी गेली दुरी । चरणीं भक्ती जडली तैं ।।३७।। सकळ सभा आनंदली । समस्ती

पाउलें वंदिलीं । षोडशोपचारें पूजिली । स्वामिमूर्ती नृपरायें ।।३८।। निराकार आणि निर्गुण । भक्तांसाठीं झाले सगुण । तयांच्या पादुका शिरीं धरोन । विष्णु नाचे ब्रह्मानंदें ।।३९।। स्वामीचरित्र सारामृत । नाना प्राकृत कथा संमत । प्रेमळ भक्त परिसोत । तृतीयोऽध्याय गोड हा ।।४०।। श्रीस्वामीराजार्पणमस्तु ।। श्रीरस्तु ।। शुभं भवतु ।। इति श्रीस्वामीचरित्रसारामृत अक्कलकोटनगरप्रवेशें तृतीयोऽध्यायः ।।३।।

# ।। चतुर्थोऽध्यायः ।।

श्रीगणेशाय नमः ।। मुखें कीर्तन करावें । अथवा श्रवणीं ऐकावे । षोडशोपचारें पूजावे । स्वामीचरण भक्तीनें ।।१।। नलगे करणें तीर्थाटण । योगाभ्यास होमहवन । सांडोनियां अवघा शीण । नामस्मरण करावें ।।२।। स्वामीनामाचा जप करितां । चारी पुरूषार्थ येती हाता । स्वामीचरित्र गातां ऐकतां । पुनरावृत्ति चुकेल ।।३।। गताध्यायाचे अंती । अक्कलकोटीं आले यती । नृपराया दर्शन देती । स्वेच्छेनें राहती तया पुरीं ।।४।। चोळाप्पाचा दृढ भाव । घरीं राहिले स्वामीराव । हें तयाचें सुकृत पूर्व । नित्य सेवा घडे त्यातें ।।५।। जे केवळ वैकुंठवासी । अष्टसिध्दी ज्यांच्या दासी । नवनिधी तत्पर सेवेसी । ते धरिती मानवरूप ।।६।। चोळाप्पा केवळ निर्धन । परी स्वामीकृपा होतां पूर्ण । लक्ष्मी होऊनिया आपण । सहज आली तया घरीं ।।७।। कैसी आहे तयाची भक्ती । नित्य पाहती परीक्षा यती । नानाप्रकारें त्रास देती । परी तो कधीं न कंटाळे ।।८।।

चोळाप्पाची सद्‌गुणी कांता । तीही केवळ पतिव्रता । सदोदित तिच्या चित्ता । आनंद स्वामीसेवेचा ।।९।। स्वामी नाना खेळ खेळती । विचित्र लीला दाखविती । नगरवासी जनांची भक्ती । दिवसेंदिवस दृढ जडली ।।१०।। स्वामी केवळ ईश्वरमूर्ती । देशोदेशी झाली ख्याती । बहुत लोक दर्शना येती । कामना चित्तीं धरोनी ।।११।। कोणी संपत्तीकारणें । कोणी मागती संतानें । व्हावें म्हणोनिया लग्न । येती दूर देशाहुनी ।।१२।। शरीरभोगें कष्टले । संसारतापें तप्त झाले । मायामय पसाऱ्यातें फसले । ऐसे आले कितीएक ।।१३।। सर्वांसी कल्पद्रुमासमान । होऊनी कामना करिती पूर्ण । भक्तकाजास्तव अवतीर्ण । मानवरूपें जाहले ।।१४।। भक्त अंतरीं जें जें इच्छिती । तें तें यतिराज पुरविती । दृढ चरणीं जयांची भक्ती । त्यांसीं होती कल्पतरू ।।१५।। जे कां निंदक कुटिल । तयां शास्ते केवळ । नास्तिकांप्रती तात्काळ । योग्य शासन करिताती ।।१६।। महिमा वाढला विशेष । कित्येक करूं लागले द्वेष । कोणा एका समयास । वर्तमान घडलें पै ।।१७।। कोणी दोन संन्यासी । आले अक्कलकोटासी । हंसोनी म्हणती

जनांसी । ढोंगियाच्या नादीं लागलां ।।१८।। स्वामी नव्हे ढोंगी । नाना भोग भोगी । साधू लक्षण याचे अंगी । कोणतें हो वसतसे ।।१९।। काय तुम्हां वेड लागलें । वंदितां ढोंग्याची पाउलें । यांत स्वार्थ ना परमार्थ मिळे । फसलां तुम्हीं अवघेही ।।२०।। ऐसें तयांनीं निंदिले । समर्थांनीं अंतरीं जाणिलें । जेव्हां ते भेटीसी आले । तेव्हां केलें नवल एक ।।२१।। पहावया आले लक्षण । समर्थ समजले ती खूण । ज्या घरीं बैसले तेथोन । उठोनियां चालिले ।।२२।। एका भक्ताचिया घरीं । पातली समर्थांची स्वारी । तेही दोघे अविचारी । होते बरोबरी संन्यासी ।।२३।। तेथें या तिन्ही मूर्ती । बैसविल्या भक्तें पाटावरती । श्रीस्वामी आपुले चित्तीं । चमत्कार म्हणती करूं आतां ।।२४।। दर्शनेच्छु जन असंख्यात । पातले तेथें क्षणार्धात । समाज दाटला बहुत । एकची गर्दी जाहली ।।२५।। दर्शन घेऊनी चरणांचें । मंगल नाम गर्जती वाचे । हेतू पुरवावे मनींचे । म्हणोनियां विनविती ।।२६।। कोणी द्रव्य पुढें ठेविती । कोणी फळे समर्पिती । नानावस्तु अर्पण करिती । नाही मिती तयातें ।।२७।। कोणी नवसातें करिती ।। कोणी

आणोनियां देती । कोणी कांही संकल्प करिती । चरण पूजिती आनंदे ।।२८।। संन्यासी कौतुक पाहती । मनामाजी आश्चर्य करिती । क्षण एक तटस्थ होती । वैरभाव विसरोनी ।।२९।। क्षण एक घडतां सत्संगती । तात्काळ पालटे की कुमती । म्हणोनी कवि वर्णिताती । संतमहिमा विशेष ।।३०।। स्वामीपुढें जे जे पदार्थ । पडले होते असंख्यात । ते निजहस्तें समर्थ । संन्याशापुढें लोटिती ।।३१।। पाणी सुटलें त्यांच्या मुखांसी । म्हणती यथेच्छ मिळेल खावयासी । आज सारा दिवस उपवासी । जीव आमुचा कळवळला ।।३२।। मोडली जनांची गर्दी । तो येवोनी सेवेकरी । संन्याशांपुढल्या नानापरी । वस्तू नेऊं लागले ।।३३।। तेव्हां एका क्षणार्धात । द्रव्यादिक सारें नेत । संन्यासी मनीं झुरत । व्याकुळ होत भुकेनें ।।३४।। समर्थांनी त्या दिवशीं । स्पर्श न केला अन्नोदकासी । सूर्य जातां अस्ताचळासी । तेथोनियां ऊठले ।।३५।। दोघे संन्यासी त्या दिवशीं । राहिले केवळ उपवासी । रात्र होता तयांसी । अन्नोदक वर्ज्य असे ।।३६।। जे पातले करूं छळणा । त्यांची जाहली विटंबना । दंडावया कुत्सित जनां । अवतरले

यतिवर्य ।।३७।। तयांच्या चरणीं ज्यांची भक्ती । त्यांचे मनोरथ पुरविती । पसरली जगीं ऐसी ख्याति । लीला ज्यांची विचित्र ।।३८।। श्रीपादवल्लभभक्ती । कलियुगीं वाढेल निश्चिती । त्यांचा अवतार स्वामी यति । वर्णी कीर्ति विष्णुदास ।।३९।। श्रीस्वामीचरित्रसारामृत । नाना प्राकृत कथा संमत । सदा परिसोत प्रेमळ भक्त । चतुर्थोऽध्याय गोड हा ।।४०।। श्रीस्वामीराजार्पणमस्तु ।। श्रीरस्तु ।। शुभं भवतु ।।

# ।। पंचमोऽध्यायः ।।

श्रीगणेशाय नमः ।। भवकानन वैश्वानरा । अज्ञानतमच्छेदका भास्करा । पूर्णसाक्षी परात्परा । भक्तां खरा सदय तूं ।।१।। गंगाजळ जैसें निर्मळ । तैसें तुझें मन कोमल । तुजसी स्तवितां प्रेमळ । सत्वर त्यांतें पावसी ।।२।। विशेष गंगाजळाहून आपुलें असे महिमान । पाप ताप आणि दैन्य । तुमच्या स्मरणें निवारती ।।३।। स्वामीचरित्र कराया श्रवण । श्रोते बैसले सावधान । प्रसंगाहुनी प्रसंग पूर्ण । रसभरित पुढें पुढें ।।४।। ज्यांचे सबळ पूर्वपुण्य । तयां झाले स्वामीदर्शन । ऐसे चोळाप्पा आदीकरून । भाग्यवंत सेवेकरी ।।५।। अक्कलकोट नगरांत । एक तपपर्यंत । स्वामीराज वास करीत । भक्त बहुत जाहले ।।६।। वार्ता पसरली चहूंकडे । कोणासी पडतां सांकडें । धाव घेती स्वामींकडे । राजेरजवाडे थोर थोर ।।७।। म्हणती भोंसल्यांचे भाग्य परम । स्वामीरत्न लाधलें उत्तम । नृपतीही भक्त निस्सीम । स्वामीचरणीं चित्त त्यांचे ।।८।। तेव्हां कितिएक नृपती । स्वामीदर्शन घेऊं इच्छिती ।

आणि आपुल्या नगराप्रती । आणूं म्हणती तयांसी ।।९।। बडोद्यामाजी त्या अवसरीं । मल्हारराव राज्याधिकारी । एकदां तयांचे अंतरीं । विचार ऐसा पातला ।।१०।। अक्कलकोटाहुनी स्वामींसी । आणावें आपुल्या नगरासी । मग कोणे एके दिवशीं । सभेमाजी बैसले ।।११।। दिवाण आणि सरदार । मानकरी तैसे थोर थोर । बैसले असतां समग्र । बोले नृपवर तयांप्रती ।।१२।। कोणी जाऊनी अक्कलकोटासी । येथें आणील स्वामींसी । तरी आम्ही तयासी । इनाम देऊं बहूत ।।१३।। त्याचा राखूं सन्मान । लागेल तितुकें देऊं धन । ही वटपुरी वैकुंठभुवन । वसतां स्वामी होईल ।।१४।। कार्य जाणूनि कठीण । कोणी न बोलती वचन । कोणा एका लागून । गोष्ट मान्य करवेना ।।१५।। तेव्हा तात्यासाहेब सरदार । होता योग्य आणि चतुर । तो बोलता झाला उत्तर । नृपालागीं परियेसा ।।१६।। आपुली जरी इच्छा ऐसी । स्वामीतें आणावें वटपुरीसी । तरी मी आणीन तयांसी । निश्चय मानसीं असो द्या ।।१७।। ऐसें ऐकोनी उत्तर । संतोषला तो नृपवर । तैसी सभाही समग्र । आनंदित जाहली ।।१८।। संजीवनी विद्या

साधायाकरितां । शुक्राजवळी कच जातां । देवीं सन्मानिला होता । बहुत आनंदें करोनी ।।१९।। नृपतीसह सकळ जने । त्यापरी तात्यासीं सन्मानें । गौरवोनी मधुर वचनें । यशस्वी हो म्हणती तया ।।२०।। बहुत धन देत नृपती । सेवक दिधले सांगाती । जावया अक्कलकोटाप्रती । आज्ञा दिली तात्यातें ।।२१।। तात्यासाहेब निघाले । सत्वर अक्कलकोटीं आले । नगर पाहुनी संतोषले । जें केवळ वैकुंठ ।।२२।। पाहुनी स्वामींची दिव्य मूर्ती । आनंदित झाले चित्तीं । तेथील जनांची पाहुनी भक्ती । धन्य म्हणती तयांतें ।।२३।। अक्कलकोटींचे नृपती । स्वामीचरणीं त्यांची भक्ती । राजघराण्यांतील युवती । त्याही करिती स्वामीसेवा ।।२४।। आणि सर्व नागरिक । तेही झाले स्वामीसेवक । त्यांत वरिष्ठ चोळाप्पादिक । सेवेकरी निस्सीम ।।२५।। ऐसे पाहुनी तात्यांसी । विचार पडला मानसीं । या नगरांतुनी स्वामींसी । कैसें नेऊं आपण ।।२६।। अक्कलकोटींचे सकल जन । स्वामीभक्त झाले पूर्ण । स्वामींचेंही मन रमोन । गेलें असे त्यां ठायां ।।२७।। प्रयत्नांतीं परमेश्वर । प्रयत्नें कार्य होय सत्वर । लढवोनी युक्ती

थोर । कार्य आपण साधावें ।।२८।। ऐसा मनीं विचार करोनी । कार्य आरंभिलें तात्यांनी । संतुष्ट रहावें सेवेकजनीं । ऐसें सदा करिताती ।।२९।। करोनी नाना पक्वान्ने । करिती ब्राह्मणभोजनें । दिधलीं बहुसाल दानें । याचक धनें तृप्त केले ।।३०।। स्वामीचिया पूजेप्रती । नाना द्रव्यें समर्पिती । जेणें सेवेकरी संतुष्ट होती । ऐसें करिती सर्वदा ।।३१।। प्रसन्न व्हावें भक्त वत्सलें । कार्य साधावें आपुलें । म्हणोनी नाना उपाय केले । द्रव्य वेंचिलें तात्यांनी ।।३२।। ऐशीयानें काही न झालें । केलें तितुकें व्यर्थ गेलें । तात्या मनीं खिन्न झाले । विचार पडला तयांसी ।।३३।। मग लढविली एक युक्ती । एकांतीं गांठुनी चोळाप्पाप्रती । त्याजलागीं विनंती करिती । बुध्दिवाद सांगती त्या ।।३४।। जरी तुम्ही समर्थांसी घेऊनी याल बडोद्यासी । मग मल्हारराव आदरेंसी । इनाम देतील तुम्हांतें ।।३५।। मान राहील दरबारीं । आणि देतील जहागिरी । ऐसें नानाप्रकारी । चोळाप्पातें सांगितलें ।।३६।। द्रव्येण सर्वे वशाः । चोळाप्पासी लागली आशा । तयाच्या अंतरी भरंवसा । जहागिरीचा बहुसाल ।।३७।। मग कोणे एके दिवशीं । करीत

असतां स्वामीसेवेसी । यतिराज तया समयासी । आनंदवृत्ती बैसले ।।३८।।
चोळाप्पानें कर जोडोनी । विनंती केली मधुर वचनीं । कृपाळू होउनी समर्थांनी ।
बडोद्याप्रती चलावें ।।३९।। तेणें माझें कल्याण । मिळेल मला बहुत धन ।
आपुलाही योग्य सन्मान । तेथें जातां होईल ।।४०।। ऐसें ऐकोनियां वचन ।
समर्थांनीं हास्य करोन । उत्तर चोळाप्पा लागोन । काय दिलें सत्वर ।।४१।।
रावमल्हार नृपती । त्यांच्या अंतरी नाहीं भक्ती । मग आम्ही बडोद्याप्रती । काय
म्हणोनी चलावें ।।४२।। पुढले अध्यायीं सुंदर कथा । पावन होय श्रोता वक्ता ।
श्रीस्वामीराज वदविता । निमित्त विष्णुदास असे ।।४३।। इति
श्रीस्वामीचरित्रसारामृत । नाना प्राकृत कथा संमत । सदा ऐकोत भाविक भक्त ।
पंचमोऽध्याय गोड हा ।।४४।। श्रीरस्तु ।। शुभं भवतु ।।

# ।। षष्ठोऽध्यायः ।।

श्रीगणेशाय नमः । धरोनी शिशूचा हात । अक्षरें पंडित लिहिवीत । तैसें हें स्वामीचरित्रामृत । स्वामी समर्थ वदविती ।।१।। मी केवळ मतिमंद । केवीं वर्णू चरित्र अगाध । परी माझा हा छंद । स्वामी समर्थ पुरविती ।।२।। ज्यांच्या वरप्रसादें करून । मूढां होय शास्त्रज्ञान । त्या समर्थांचे चरण । वारंवार नमीतसे ।।३।। कृपाळू होउनी समर्था । वदवावे आपुल्या चरिता । श्रवणें श्रोतयांच्या चित्ता । ब्रह्मानंद प्राप्त होवो ।।४।। सुरतरूचीं घेऊनी सुमनें ।। त्यासीच अर्पावीं प्रीतीनें । झाला ग्रंथ स्वामीकृपेनें । त्यांच्याच पदीं अर्पिजे ।।५।। मागील अध्यायाच्या अंती । चोळाप्पा विनवी स्वामीप्रती । कृपा करोनी मजवरती । बडोद्यासी चलावें ।।६।। भाषण ऐसें ऐकोनी । समर्थ बोलती हांसोनी । मल्हाररावाचिया मनीं । आम्हांविषयीं भाव नसे ।।७।। म्हणोनी तयाच्या नगरांत । आम्हां जाणें नव्हे उचित । अक्कलकोट नगरांत । आम्हां राहणें आवडे ।।८।। ऐसी ऐकोनियां वाणी ।

चोळाप्पा खिन्न झाला मनीं । त्यानें सत्वर येवोनी । तात्याप्रती सांगितलें ।।९।। ऐसा यत्न व्यर्थ गेला । तात्या मनीं चिंतावला । आपण आलों ज्या कार्याला । तें न जाय सिध्दीसी ।।१०।। परी पहावा यत्न करोनी । ऐसा विचार केला मनीं । मग काय केलें तात्यांनी । अनुष्ठान आरंभिले ।।११।। ऐसे नाना उपाय केले । परी ते सर्व व्यर्थ गेले । कार्य सिध्दीस न गेलें । खिन्न झालें मुख त्यांचे ।।१२।। भक्ती नाहीं अंतरीं । दांभिक साधनांतें करी । तयांतें स्वामी नरहरी । प्रसन्न कैसे होतील ।।१३।। तयांनीं माजविलीं ढोंगें । आणि केलीं नाना सोंगें । भक्तीविण हठयोगें । स्वामीकृपा न होय ।।१४।। मग तात्यांनीं काय केलें । सप्ताहासी ब्राह्मण बैसविले । गुरूचरित्र आरंभिले । व्हावयासी स्वामीकृपा ।।१५।। परी तयाच्या वाड्यांत । कधी न गेले समर्थ । तात्या झाला व्यग्रचित्त । कांही उपाय सुचेना ।।१६।। मल्हारराव नृपानें । पाठविलें ज्या कार्याकारणें । तें आपल्या हातून होणें । अशक्य ऐसें वाटतें ।।१७।। आतां जाउनी बडोद्यासी । काय सांगावें राजयासी । आणि सकळ जनांसीं । तोंड कैसें दाखवावें ।।१८।। ऐशा उपायें

करोन । न होती स्वामी प्रसन्न । आतां एक युक्ती योजून । न्यावें पळवोन यतीसी ।।१९।। स्वामी केवळ ईश्वरमूर्ती । हें नेणें तो मंदमती । म्हणूनी योजिली कपटयुक्ति । परी तें सिध्दीतें न जाय ।।२०।। असो कोणे एके दिवशीं । साधोनी योग्य समयासी । मेण्यांत घालोनी स्वामींसी । तात्यासाहेब निघाले ।।२१।। कडपगांवचा मार्ग धरिला । अर्धमार्गी मेणा आला । अंतरसाक्षी समर्थाला । गोष्ट विदित जाहली ।।२२।। मेण्यांतुनी उतरले । मागुती अक्कलकोटीं आले । ऐसें बहुत वेळां घडलें । हाही उपाय खुंटला ।।२३।। मग पुढें राजवाड्यांत । जाउनिया राहिले समर्थ । तेव्हां उपाय खुंटत । टेंकिले हात तात्यांनी ।।२४।। या प्रकारें यत्न केले । परी तितुके व्यर्थ गेले । व्यर्थ दिवस गमाविले । द्रव्य खर्चिलें व्यर्थची ।।२५।। मग अपयशातें घेवोनी । बडोद्यासी आले परतोनी । समर्थकृपा भक्तीवांचोनी । अन्य उपाये न होय ।।२६।। परी मल्हारराव नृपती । प्रयत्न आरंभीत पुढती । सर्वत्रांसी विचारती । कोण जातो स्वामीकडे ।।२७।। तेव्हां मराठा उमराव । यशवंत तयांचें नांव । नृपकार्याची धरूनी हांव । आपण पुढें

जाहला ।।२८।। स्वामीकारणें वस्त्रें भूषणें । धन आणि अमोल रत्नें । देउनी त्याजवळी नृपानें । आज्ञा दिधली जावया ।।२९।। तो येवोनी अक्कलकोटीं । घेतली समर्थांची भेटी । वस्त्रे अलंकार सुवर्णताटीं । स्वामीपुढें ठेवित ।।३०।। ती पाहुनी समर्थाला । तेव्हां अनिवार क्रोध आला । यशवंता पाहोनि डोळां । काय तेव्हां बोलले ।।३१।। अरे बेडी आणोनी । सत्वर ठोका याचे चरणीं । ऐसें त्रिवार मोठ्यांनी । समर्थ क्रोधें बोलले ।।३२।। क्रोधमुद्रा पाहोनी । यशवंतराव भ्याला मनीं । पळालें तोंडचें पाणी । लटलटां कापूं लागला ।।३३।। मग थोड्याच दिवशीं । आज्ञा आली यशवंतासी । सत्वर यावें बडोद्यासी । तेथील कार्यासी सोडोनी ।।३४।। साहेबा विषप्रयोग केला । मल्हाररावावरी आळ आला । त्या कृत्यामाजी यशवंताला । गुन्हेगार लेखिलें ।।३५।। हातीं पायीं बेडी पडली । स्वामीवचनाची प्रचिती आली । अघटित लीला दाविली । ख्याती झाली सर्वत्र ।।३६।। समर्थांची अवकृपा जयावरी । त्याच्या कष्ट होती शरीरीं । कृपा होय जयावरी । तया सर्वानंद प्राप्त होय ।।३७।। महासमर्था भक्तपालका ।

अनादिसिध्दा जगन्नायका । निशिदिनीं शंकर सखा । विष्णुचिया मनीं वसे ।।३८।।
इति श्रीस्वामीचरित्रसारामृत । नाना प्राकृत कथासंमत । सदा भक्त परिसोत ।
षष्ठोऽध्याय गोड हा ।।३९।। इति श्रीस्वामीचरित्रसारामृते षष्ठोऽध्यायः समाप्तः ।।
शुभं भवतु ।।

# ।। सप्तमोऽध्यायः ।।

श्रीगणेशाय नमः ।। जयजयाजी निर्गुणा । जयजयाजी सनातना । जयजयाजी अघहरणा । लोकपाला सर्वेशा ।।१।। आपुल्या कृपेकरोन । अल्प वर्णिले आपुले गुण । श्रोतीं द्यावें अवधान । श्रवणीं आदर धरावा ।।२।। अक्कलकोटीं मालोजी नृपती । समर्थचरणीं जयांची भक्ती । स्वहस्तें सेवा नित्य करिती । जाणोनि यती परब्रह्म ।।३।। वेदान्त आवडे तयासी । श्रवण करिती दिवसनिशीं । हेरळीकरादिक शास्त्र्यांसी । वेतनें देउनी ठेविले ।।४।। त्या समयीं मुंबापुरी । विष्णुबुवा ब्रह्मचारी । प्राकृत भाषण वेदान्तावरी । करूनी लोकां उपदेशिती ।।५।। कैकांचे भ्रम दवडिले । परधर्मोपदेशकां जिंकलें । कुमार्गवर्तियांसी आणिलें । सन्मार्गावरी तयांनी ।।६।। त्यांसी आणावें अक्कलकोटीं । हेतु उपजला नृपा पोटीं । बहुत करोनि खटपटी । बुवांसी शेवटीं आणिलें ।।७।। नृपा आवडे वेदान्त । बुवा त्यांत पारंगत । भाषणें श्रोतयांचें चित्त । आकर्षुनी घेती ते ।।८।। रात्रंदिन नृपमंदिरीं । वेदान्तचर्चा

ब्रह्मचारी । करिती तेणें अंतरीं । नृपती बहु सुखावे ।।९।। अमृतानुभवादि ग्रंथ । आणि ज्ञानेश्वरी विख्यात । कित्येक संस्कृत प्राकृत । वेदान्त ग्रंथ होते जे ।।१०।। त्यांचे करोनि विवरण । संतोषित केले सर्व जन । तया नगरीं सन्मान । बहुत पावले ब्रह्मचारी ।।११।। ख्याती वाढली लोकांत । स्तुती करिती जन समस्त । सदा चर्चा वेदान्त । राजगृहीं होतसे ।।१२।। जें भक्तजनांचें माहेर । प्रत्यक्ष दत्ताचा अवतार । ते समर्थ यतीश्वर । अक्कलकोटीं नांदती ।।१३।। एके दिवशी सहज स्थिती । ब्रह्मचारी दर्शना येती । श्रेष्ठ जन सांगाती । कित्येक होते तया वेळीं ।।१४।। पहावया यतीचें लक्षण । ब्रह्मचारी करिती भाषण । कांहीं वेदान्तविषय काढून । प्रश्न करिती स्वामींसी ।।१५।। ब्रह्मपद तदाकार । काय केल्यानें होय निर्धार । ऐसें ऐकोनि सत्वर । यतिराज हांसले ।।१६।। मुखें कांहीं न बोलती । वारंवार हास्य करिती । पाहुनी ऐसी विचित्र वृत्ति । बुवा म्हणती काय मनीं ।।१७।। हा तो वेडा संन्यासी । भुरळ पडली लोकांसी । लागले व्यर्थ भक्तीसी । यानें ढोंग माजविलें ।।१८।। तेथोनी निघाले ब्रह्मचारी । आले सत्वर बाहेरी । लोकां बोलती

हास्योत्तरीं । तुम्ही व्यर्थ फसलां हो ।।१९।। परमेश्वररूप म्हणतां यती । आणि करितीं त्याची भक्ती । परी हा भ्रम तुम्हांप्रती । पडला असे सत्यची ।।२०।। पाहोनि तुमचें अज्ञान । यांचे वाढलें ढोंग पूर्ण । वेदशास्त्रादिक ज्ञान । यातें कांहीं असेना ।।२१।। ऐसे ब्रह्मचारी बोलोनी । पातले आपुल्या स्वस्थांनीं । विकल्प पातला मनीं । स्वामीसी तुच्छ मानिती ।।२२।। नित्यनियम सारोन । ब्रह्मचारी करिती शयन । जवळी पारशी दोघेजण । तेहि निद्रिस्थ जाहलें ।।२३।। निद्रा लागली, बुवांसी । लोटलीया कांहीं निशी । एक स्वप्न तयांसी । चमत्कारिक पडलेंसे ।।२४।। आपुल्या अंगावरी वृश्चिक । एकाएकीं चढले असंख्य । महा विषारी त्यांतुनी एक । दंश आपणा करीतसे ।।२५।। ऐसें पाहोनी ब्रह्मचारी । खडबडोनी उठले लौकरी । बोबडी पडली वैखरी । शब्द एक न बोलवे ।।२६।। जवळी होते जे पारशी । जागृती आली तयांसी । त्यांनी धरोन बुवांसी । सावध केलें त्या वेळीं ।।२७।। हृदय धडधडा उडूं लागलें । घर्में शरीर झालें ओलें । तेव्हां पारशांनीं पुसलें । काय झालें म्हणोनी ।।२८।। मग स्वप्नींचा वृत्तांत ।

तयांसी सांगती समस्त । म्हणती यांत काय अर्थ । ऐसीं स्वप्ने कैक पडती ।।२९।। असो दुसऱ्याच दिवशीं । बुवा आले स्वामीपाशी । पुसतां मागील प्रश्नासी । खदखदां स्वामी हांसले ।।३०।। मग काय बोलती यतीश्वर । ब्रह्मपद तदाकार । होण्याविषयीं अंतर । तुझें जरी इच्छितसे ।।३१।। तरी स्वप्नीं देखोनी वृश्चिकांसी । काय म्हणोनी भ्यालासी । जरी वृथा भय मानितोसी । मग ब्रह्मपद जाणसी कैसे ।।३२।। ब्रह्मपद तदाकार होणें । हे नव्हे सोपें बोलणें । यासी लागती कष्ट करणें । फुकट हातां नयेची ।।३३।। बुवांप्रती पटली खूण । धरिले तत्काळ स्वामीचरण । प्रेमांश्रूंनीं भरलें नयन । कंठ झाला सद्‌गदित ।।३४।। तया समयापासोनी । भक्ती जडली स्वामीचरणीं । अहंकार गेला गळोनी । ब्रह्मपदा योग्य झाले ।।३५।। स्वामीचरित्र महासागर । त्यांतुनी मुक्तें निवडुनी सुंदर । त्यांचा करोनिया हार । अर्पी शंकरा विष्णुकवि ।।३६।। इति श्रीस्वामीचरित्रसारामृत । नाना प्राकृत कथा संमत । सदा परिसोत भाविक भक्त । सप्तमोऽध्याय गोड हा ।।३७।। श्रीराजाधिराज योगिराज श्रीस्वामीसमर्थार्पणमस्तु ।।

।। अध्याय ७ वा ।।३७।।

# ।। अष्टमोऽध्यायः ।।

श्रीगणेशाय नमः ।। जयजयाजी सुखधामा । जयजयाजी परब्रह्मा । जयजय भक्तजन विश्रामा । अनंतवेषा अनंता ।।१।। तुझ्याच कृपें निश्चित । अल्प वर्णिलें स्वामीचरित । पुढे कथा सुरस अत्यंत । वदविता तूं दयाळ ।।२।। मागील अध्यायाचे अंतीं । विष्णुबुवा ब्रह्मचाऱ्यांप्रती । चमत्कार दाविती यती । तें चरित्र वर्णिलें ।।३।। अक्कलकोटीं वास केला । जन लाविले भजनाला । आनंद होतसे सकलां । वैकुंठासम नगरीं ते ।।४।। राजे निजाम सरकार । त्यांचे पदरी दप्तरदार । राजे रायबहाद्दर । शंकरराव नामक ।।५।। सहा लक्षांची जहागीर त्यांप्रती । सकळ सुखें अनुकूल असती । विपुल संपत्ति संतती । कांहीं कमती असेना ।।६।। परी पूर्व कर्म अगाध । तयांसी लागला ब्रह्मसमंध । उपाय केले नानाविध । परी बाधा न सोडी ।।७।। समंध-बाधा म्हणोन । चैन न पडे रात्रंदिन । गेलें शरीर सुकोन । गोड न लागे अन्नपाणी ।।८।। नावडे भोग विलास । सुखोपभोग कैंचा त्यांस ।

निद्रा नयेची रात्रंदिवस । चिंतानळे पोळले ।।९।। केलीं कित्येक अनुष्ठानें । तशींच ब्राह्मण संतर्पणें । बहुसाल दिधलीं दानें । आरोग्य व्हावें म्हणोनी ।।१०।। विटले संसारसौख्यासी । त्रासले या भव यात्रेसी । कृष्णवर्ण आला शरीरासी । रात्रंदिन चैन नसे ।।११।। विधीनें लेख भाळीं लिहिला । तो न चुकेची कवणाला । तदनुसार प्राणिमात्राला । भोगणे प्राप्त असे कीं ।।१२।। कोणालागीं जावें शरण । मजवरी कृपा करील कोण । सोडवील व्याधीपासोन । ऐसा कोण समर्थ ।।१३।। मग केला एक विचार । प्रसिध्द क्षेत्र श्रीगाणगापूर । तेथें जाउनी अहोरात्र । दत्तसेवा करावी ।।१४।। ऐसा विचार करोनी । तत्काळ आले त्या स्थानीं । स्वतः बैसले अनुष्ठानीं । व्याधी दूर व्हावया ।।१५।। सेवा केली बहुवस । ऐसे लोटले तीन मास । एके रात्रीं तयांस । स्वप्नीं दृष्टांत जाहला ।।१६।। अक्कलकोटीं जावें तुवां । तेथें करावी स्वामीसेवा । यतिवचनीं भाव धरावा । तेणें व्याधी जाय दूरी ।।१७।। शंकररावांची भक्ती । स्वामीचरणीं कांही नव्हती । म्हणोनी दृष्टांतावरती । गाणगापूर न सोडिलें ।।१८।। ते तेथेंची राहिले । आणखी अनुष्ठान

आरंभिले । पुन्हा तयांसी स्वप्न पडले । अक्कलकोटीं जावें त्वां ।।१९।। हें जाणोनि हितगोष्टीं । मानसीं विचारूनि शेवटीं । त्वरित आले अक्कलकोटीं । प्रियपत्नीसहीत ।।२०।। अक्कलकोट नगरांत । शंकरराव प्रवेशत । तों देखिले जन समस्त । प्रेमळ भक्त स्वामींचे ।।२१।। स्वामीनाम वदती वाचें । कीर्तन स्वामीचरित्रांचे । पूजन स्वामीचरणांचें । आराध्य दैवत स्वामीच ।।२२।। तया नगरीच्या नरनारी । कामधंदा करितां घरीं । स्वामीचरित्र परस्परीं । प्रेमभावें सांगती ।।२३।। कित्येक प्रातःस्नानें करोनी । पूजाद्रव्य घेवोनी । अर्पावया समर्थचरणीं । जाती अति त्वरेनें ।।२४।। महाराष्ट्र भाषा उद्यान । पद्मकुसुमें निवडोन । शंकर विष्णु दोघेजण । स्वामीचरण पूजिती ।।२५।। इति श्रीस्वामीचरित्रसारामृत । नानाप्राकृत कथा संमत । सदा परिसोत प्रेमळ भक्त । अष्टमोऽध्याय गोड हा ।।२६।। श्रीस्वामीचरणारविंदार्पणमस्तु ।। इति श्रीस्वामीचरित्रसारामृते अष्टमोऽध्यायः ।।श्रीरस्तु ।।

# ।। नवमोऽध्यायः ।।

श्रीगणेशाय नमः ।। घरोघरीं स्वामीकीर्तनें । नित्य होतीं ब्राह्मण-भोजनें । स्वामी नामाचीं जप ध्यानें । अखंडीत चालती ।।१।। दिगंतरीं गाजली ख्याती । कामना धरोनी चित्तीं । बहुत लोक दर्शना येती । अक्कलकोट नगरांत ।।२।। ब्राह्मण क्षत्रिय वैश्यादिक । शूद्र आणि अनामिक । पारसी यवन भाविक । दर्शना येती धावोनी ।३।। यात्रेची गर्दी भारी । सदा आनंदमय नगरी । साधु संत ब्रह्मचारी । फकीर संन्यासी येती पैं ।।४।। किती वर्णावें महिमान । जेथें अवतरलें परब्रह्म । ते नगरीं वैकुंठधाम । प्रत्यक्ष भासूं लागली ।।५।। असो ऐशा नगरांत । शंकरराव प्रवेशत । आनंदमय झालें चित्त । समाधान वाटलें ।।६।। यात्रेची जाहली दाटी । कैशी होईल स्वामीभेटी । हे चिंता उपजली पोटीं । मग उपाय योजिला ।।७।। जे होते स्वामीसेवक । त्यांत सुंदराबाई मुख्य । स्वामीसेवा सकळिक । तिच्या हस्तें होतसे ।।८।। तियेची घेउनी गांठी । शंकरराव सांगती गोष्टी । करोनी द्याल

स्वामीभेटी । तरी उपकार होतील ।।९।। व्याधी दूर करावी म्हणोनी । विनंती कराल स्वामीचरणीं । तरी आपणालागोनी । द्रव्य कांही देईन ।।१०।। बाईसी द्रव्यलोभ पूर्ण । आनंदलें तियेचें मन । म्हणे मी इतुकें करीन । दोन सहस्त्र रूपये द्याल कीं ।।११।। ते म्हणती बाईसी । इतुकें कार्य जरी करिसी । तरी दहा सहस्त्र रूपयांसी । देईन सत्य वचन हें ।।१२।। बाई विस्मित झाली अंतरीं । ती म्हणे हें सत्य जरी । तरी उदक घेउनी करीं । संकल्प आपण सोडावा ।।१३।। शंकरराव तैसें करिती । बाई आनंदली चित्तीं । म्हणे मी प्रार्थूनिया स्वामींप्रती । कार्य आपुलें करीन ।।१४।। मग एके दिवशीं यति । बैसले होते आनंदवृत्ति । शंकरराव दर्शन घेती । भाव चित्तीं विशेष ।।१५।। बाई स्वामींसी बोले वचन । हे गृहस्थ कुलीन । परी पूर्वकर्मे यांलागून । ब्रह्मसमंध पीडितो ।।१६।। तरी आतां कृपा करोनी । मुक्त करावें व्याधीपासोनी । ऐसें ऐकतां वरदानीं । समर्थ तेथोनी उठले ।।१७।। चालले गांवाबाहेरी । आले शेखनूराचे दर्ग्यावरी । शंकररावही बरोबरी । त्या स्थळीं पातले ।।१८।। यवनस्मशानभूमींत । आले यतिराज त्वरित । एका नूतन खांचेंत ।

निजले छाटी टाकोनी ।।१९।। सेवेकरी शंकररावांसी । म्हणती लीला करूनी ऐशी । चुकविलें तुमच्या मरणासीं । निश्चय मानसीं धरावा ।।२०।। कांहीं वेळ गेल्यावरी । उठली समर्थांची स्वारी । शेखनूराचे दर्ग्यावरी । येउनी पुढें चालले ।।२१।। शंकररावें तया दिवशीं । खाना दिधला फकीरांसी । आणि शेखनूर दर्ग्यासी । एक कफनी चढवली ।।२२।। मग कांहीं दिवस लोटत । स्वामीराज आज्ञापित । बारीक वांटुनी निंबपत्र । दहा मिरें त्यांत घालावीं ।।२३।। तें घ्यावें हो औषध । तेणें जाईल ब्रह्मसमंध । जाहल्या स्वामीराज वैद्य । व्याधी पळे आपणची ।।२४।। स्वामीचरणीं धरूनी भाव । औषध घेती शंकरराव । तयांसी आला अनुभव । दहा दिवस लोटले ।।२५।। प्रकृतीसी आराम पडला । राव गेले स्वनगराला । काहीं मास लोटतां तयांला । ब्रह्मसमंधें सोडिलें ।।२६।। मग पुन्हा आनंदेसी । दर्शना आले अक्कलकोटासी । घेउनी स्वामीदर्शनासी । आनंदीत जाहले ।।२७।। म्हणती व्याधी गेल्यानंतर । रूपये देईन दहा सहस्त्र । ऐसा केला निर्धार । त्याचें काय करावें ।।२८।। महाराज आज्ञापिती । गांवाबाहेर आहे

मारुती । तेथें चुनेगच्ची निश्चिती । मठ तुम्हीं बांधावा ।।२९।। ऐशिया एकांत स्थानीं । रहाणार नाहीं कोणी । ऐशी विनंती स्वामीचरणीं । कारभारी करिताती ।।३०।। परी पुन्हा आज्ञा झाली । मठ बांधावा त्याच स्थळीं । भुजंगादिक मंडळी । दाखविली जागा तयांनी ।।३१।। सर्वांनुमतें तेथेंची । मठ बांधिला चुनेगच्ची । कीर्ति शंकररावांची । अजरामर राहिली ।।३२।। अगाध स्वामीचरित्र। तयाचा न लागेची पार । परी गंगोदक पवित्र । अल्प सेवितां दोष जाती ।।३३।। श्रवणीं धरावा आदर । तेणें साधिती इहपरत्र । जे झाले स्वामीकिंकर । विष्णु शंकर वंदिती त्यां ।।३४।। इति श्रीस्वामीचरित्रसारामृत । नाना प्राकृत कथा संमत । सदा परिसोत भाविक भक्त । नवमोऽध्याय गोड हा ।।३५।। श्रीस्वामीराजार्पणमस्तु ।। शुभं भवतु ।। श्रीरस्तु ।।

# ।। दशमोऽध्यायः ।।

श्रीगणेशाय नमः ।। गांठी होतें पूर्वपुण्य । म्हणुनी पावलों नरजन्म । याचें सार्थक उत्तम । करणे उचित आपणां ।।१।। ऐसा मनीं करूनि विचार । आरंभिले स्वामीचरित्र । ते शेवटासी नेणार । स्वामी समर्थ असती पैं ।।२।। हावेरी नामक ग्रामीं । यजुर्वेदी गृहस्थाश्रमी । बाळाप्पा नामें द्विज कोणी । रहात होते आनंदें ।।३।। संपत्ति आणि संतति । अनुकूल सर्व तयांप्रती । सावकारी सराफी करिती । जनीं वागती प्रतिष्ठित ।।४।। तीस वर्षांचे वय झालें । संसारातें उबगले । सद्‌गुरूसेवेचे दिवस आले । मती पालटली तयांची ।।५।। लटिका अवघा संसार । या माजी नाहीं सार । परलोकी दारापुत्र । कोणी न ये कामातें ।।६।। इहलोकीं जें जें करावें । परलोकी त्याचें फळ भोगावें । दुष्कर्मानें दुःख भोगावें । सत्कर्मे सौख्य पाविजे ।।७।। बाळाप्पाचे मनांत । यापरी विचार येत । सदा उद्विग्न चित्त । व्यवहारी सौख्य वाटेना ।।८।। जरी संसारीं वर्तती । तरी मनी नाहीं शांती ।।

योग्य सद्‌गुरू आपणाप्रती । कोठें आतां भेटेल ।।९।। हाचि विचार रात्रंदिन । चित्ताचें न होय समाधान । तयांप्रती सुस्वप्न । तीन रात्रीं एक पडे ।।१०।। पंचपक्वान्नें सुवर्ण ताटीं । भरोनि आपणापुढें येती । पाहोनिया ऐशा गोष्टी । उल्हासलें मानस ।।११।। तत्काळ केला निर्धार । सोडावें सर्व घरदार । मायापाश दृढतर । विवेकशस्त्रें तोडावा ।।१२।। सोलापुरीं काम आम्हांसी । ऐसें सांगुनी सर्वत्रांसी । निघाले सद्‌गुरू शोधासी । घरदार सोडिलें ।।१३।। मुरगोड ग्राम प्रख्यात । तेथें आले फिरत फिरत । जेथें चिदंबर दीक्षित । महापुरूष जन्मले ।।१४।। ते ईश्वरी अवतार । लोकां दाविले चमत्कार । तयांचा महिमा अपार । वर्णूं केवीं अल्पमती ।।१५।। स्वामीचरित्र वर्णितां । चिदंबर दीक्षितांची कथा । आठवली ते वर्णितां । सर्व दोष हरतील ।।१६।। महायात्रा संकल्पेंकरून । जन निघती घराहून । परी मार्गी लागल्या पुण्यस्थान । स्नान दान करिताती ।।१७।। महायात्रा स्वामीचरित्र । पंथ क्रमितां मी किंकर । मार्गी लागलें अति पवित्र । चिदंबर पुण्यस्थान ।।१८।। तयांचें घेउनी दर्शन । पुढें करावें मार्गक्रमण । श्रोतीं होऊनी

सावधान । श्रवणीं सादर असावें ।।१९।। मुरगोडीं मल्हार दीक्षित । वेदशास्त्रीं पारंगत । धर्मकर्मी सदा रत । ईश्वरभक्त तैसाची ।।२०।। जयांची ख्याती सर्वत्र । विद्याधनाचें माहेर । अलिप्तपणें संसार । करोनि काळ क्रमिताती ।।२१।। परी तयां नाहीं संतती । म्हणोनिया उद्विग्न चित्तीं । मग शिवाराधना करिती । कामना चित्तीं धरोनी ।।२२।। द्वादशवर्षें अनुष्ठान । केलें शंकराचें पूजन । सदाशिव प्रसन्न होऊन । वर देत तयांसी ।।२३।। तुझी भक्ती पाहोन । संतुष्ट झालें माझें मन । मीच तुझा पुत्र होईन । भरवंसा पूर्ण असावा ।।२४।। ऐकोनिया वरासी । आनंदले मानसीं । वार्ता सांगतां कांतेसी । तेही चित्तीं तोषली ।।२५।। तियेसी झालें गर्भधारण । आनंदलें उभयतांचें मन । जो साक्षात् उमारमण । तिच्या उदरीं राहिला ।।२६।। अनंत ब्रह्मांड ज्याचे उदरीं । इच्छामात्रें घडी मोडी । तो परमात्मा त्रिपुरारी । गर्भवास भोगित ।।२७।। नवमास भरतां पूर्ण । कांता प्रसवली पुत्ररत्न । मल्हार दीक्षितें आनंदोन । संस्कार केले यथाविधी ।।२८।। चिदंबर नामाभिधान । ठेवियलें तयालागुन । शुक्लपक्षीय शशिसमान । बाळ वाढूं लागलें ।।२९।। प्रत्यक्ष

शंकर अवतरला । करूं लागला बाललीला । पाहोनी जननी - जनकांला । कौतुक अत्यंत वाटतसे ।।३०।। पुढें केलें मौंजीबंधन । वेदशास्त्रीं झाले निपुण । निघंट शिक्षा व्याकरण । काव्यग्रंथ पढविले ।।३१।। एकदा यजमानाचे घरीं । व्रत होते गजगौरी । चिदंबर तया अवसरीं । पूजेलागीं आणिले ।।३२।। मृत्तिकेचा गज करोन । पूजा करिती यजमान । यथाविधी सर्व पूजन । दीक्षित त्यांसी सांगती ।।३३।। प्राणप्रतिष्ठा मंत्र म्हणतां । गजासी प्राण येउनी तत्वतां । चालू लागला हें पाहतां । विस्मित झाले यजमान ।।३४।। बाळपणीं ऐसी कृति । पाहोनी सर्व आश्चर्य करिती । हे ईश्वर अवतार म्हणती । सर्वत्र ख्याती पसरली ।।३५।। ऐशा लीला अपार । दाखविती चिदंबर । प्रत्यक्ष जे का शंकर । जगदुध्दारार्थ अवतरले ।।३६।। असो पुढें प्रौढपणीं । यज्ञ केला दीक्षितांनी । सर्व सामग्री मिळवुनी । द्रव्य बहुत खर्चिलें ।।३७।। तया समयीं एके दिनीं । ब्राह्मण बैसले भोजनीं । तूप गेलें सरोनी । दीक्षितांतें समजलें ।।३८।। जलें भरले होते घट । तयांसी लावितां अमृतहस्त । तें घृत झालें समस्त । आश्चर्य करिती सर्व

जन ।।३९।। तेव्हां पुणें शहरामाजी । पेशवे होते राव बाजी । एके समयीं ते सहजीं । दर्शनातें पातले ।।४०।। अन्यायानें राज्य करित । दुसऱ्यांचे द्रव्य हरित । यामुळें जन झाले त्रस्त । दाद त्यांची लागेना ।।४१।। तयांनीं हे ऐकोन । मुरगोडीं आले धावोन । म्हणती दीक्षितांसी सांगून । दाद आपुली लावावी ।।४२।। रावबाजीसी वृत्तान्त । कर्णोपकर्णी झाला श्रुत । म्हणती जें सांगतील दीक्षित । तें अमान्य करवेना ।।४३।। मग दीक्षितांसी निरोप पाठविला । आम्ही येतों दर्शनाला । परी आपण आम्हांला । त्वरित निरोप देइजे ।।४४।।, ऐसें सांगतां दीक्षितांप्रती । तया वेळीं काय बोलती । आतां पालटली तुझी मती । त्वरित मागसी निरोप ।।४५।। कोपला तुजवरी ईश्वर । जाईल राज्यलक्ष्मी सर्व । वचनीं ठेवी निर्धार । निरोप तुज दिला असे ।।४६।। सिध्दवाक्य सत्य झालें । रावबाजीचें राज्य गेलें । ब्रह्मावर्ती राहिले । परतंत्र जन्मवरी ।।४७।। एके समयीं अक्कलकोटीं । दीक्षितांच्या निघाल्या गोष्टी । तेव्हां बोलले स्वामी यती । आम्हीं त्यातें जाणतों ।।४८।। यज्ञसमारंभाचे अवसरीं । आम्ही होतो त्यांचे घरीं । तूप

वाढण्याची कामगिरी । आम्हांकडे तैं होती ।।४९।। लीलाविग्रही श्रीस्वामी । जयांचे आगमन त्रिभुवनीं । ते दीक्षितांच्या सदनीं । असतील नवल नसेची ।।५०।। महासिध्द दीक्षित । त्यांचे वर्णिलें अल्पवृत्त । मुरगोडीं बाळाप्पा येत । पुण्यस्थान जाणोनी ।।५१।। तेथें ऐकिला वृत्तान्त । अक्कलकोटीं स्वामीसमर्थ । भक्तजन तारणार्थ । यतिरूपें प्रगटले ।।५२।। अमृतासमान रसाळ कथा । ऐकतां पावन श्रोता-वक्ता । करोनिया एकाग्र चित्ता । अवधान द्यावें श्रोते हो ।।५३।। पुढले अध्यायीं कथन । बाळाप्पा करील जप ध्यान । तयाची भक्ती देखोन । स्वामी कृपा करतील ।।५४।। भक्तजनांची माऊली । अक्कलकोटीं प्रगटली । सदा कृपेची साउली । आम्हांवरी करी ते ।।५५।। मागणें हेंची स्वामीप्रती । दृढ इच्छा माझे चित्तीं । शंकराची प्रेमळ प्रीति । दास विष्णुवरी असो ।।५६।। इति श्रीस्वामीचरित्रसारामृत । नाना प्राकृत कथा संमत । सदा परिसोत प्रेमळ भक्त । दशमोऽध्याय गोड हा ।।५७।। श्रीस्वामीराजार्पणमस्तु ।। शुभं भवतु ।।श्रीरस्तु ।।

# ।। एकादशोऽध्यायः ।।

श्रीगणेशाय नमः । मागले अध्यायीं वर्णिले । बाळाप्पा मुरगोडीं आले । पुण्यस्थानीं राहिले । तीन रात्री आनंदे ।।१।। तेथें कळला वृत्तांत । अक्कलकोटीं साक्षात । यतिरूपें श्रीदत्त । वास्तव्य सांप्रत करिताती ।।२।। तेथें आपुला मनोदय । सिध्दीस जाईल निःसंशय । फिटेल सर्वही संदेह । श्रीसद्गुरु-कृपेनें ।।३।। परी मुरगोडीचे विप्र । बाळाप्पासी सांगत । गाणगापूर विख्यात । महाक्षेत्र भीमातीरीं ।।४।। तेथें आपण जावोनी । बैसावें हो अनुष्ठानीं । श्रीगुरू स्वप्नीं येवोनी । सांगती तैसें करावें ।।५।। मानला तयासी विचार । निघाले तेथुनी सत्वर । जवळी केलें गाणगापूर । परम पावन स्थान तें ।।६।। कामना धरोनी चित्तीं । सेवेकरी सेवा करिती । जेथें वाहे भीमरथी । स्नान करिती भक्तजन ।।७।। पुत्रकामना धरूनी चित्तीं । आराधिती नृसिंहसरस्वती । दरिद्री धन इच्छिति । रोगीजन आरोग्य ।।८।। कोणी घालिती प्रदक्षिणा । कोणी ब्राह्मण भोजना । कोणी करिती गंगास्नान ।

नमस्कार घालिती कोणी ।।९।। तेथील सर्व सेवेकरी । नित्य नियमें दोनप्रहरीं । मागोनिया माधुकरी । निर्वाह करिती आपुला ।।१०।। बाळाप्पा तेथें पातले । स्थान पाहोनी आनंदले । नृसिंहसरस्वती पाऊलें । प्रेमभावे वंदिली ।।११।। प्रातःकाळीं उठोनी । संगमावरी स्नान करोनी । जप ध्यान आटपोनी । मागुती येत गांवांत ।।१२।। सेवेकऱ्यांबरोबरी । मागोनिया माधुकरी । भोजनोत्तर संगमावरी । परतोनी येती ते ।।१३।। माध्यान्ह स्नान करोनी । पुन्हा बैसती जप ध्यानीं । अस्ता जातां वासरमणी । संध्यास्नान करावें ।।१४।। करोनिया संध्यावंदन । जप आणि नामस्मरण । रात्र पडतां परतोन । ग्रामामाजी येती ते ।।१५।। बाळाप्पा ते गृहस्थाश्रमी । संतती संपत्ती सर्व सदनीं । परान्न ठावें नसे स्वप्नीं । सांप्रत भिक्षा मागती ।।१६।। सद्गुरूप्राप्तीकरितां । सोडूनी गृह-सुत-कांता । शीतोष्णाची पर्वा न करितां । आनंदवृत्ती राहती ।।१७।। पंचपक्वान्नें सेविती घरीं । येथें मागती माधुकरी । मिळती कोरड्या भाकरी । उदरपूर्ती न होय ।।१८।। शीतोष्णाचा होय त्रास । अर्धपोटीं उपवास । परी तयांचें मानस । कदा उदास नोहेची ।।१९।।

अय्याराम सेवेकरी । रहात होते गाणगापुरीं । त्यांनी देखुनी ऐसीपरी । बाळाप्पासी बोलती ।।२०।। तुम्ही भिक्षा घेवोनी । नित्य यावें आमुचे सदनीं । जें जें पडेल तुम्हांस कमी । तें तें आम्ही पुरवूं जी ।।२१।। बाळाप्पासी मानवलें । दोन दिवस तैसें केलें । पोट भरोनी जेवलें । परी संकोच मानसी ।।२२।। जाणे सोडिलें त्याचे घरीं । मागोनिया माधुकरी । जावोनिया संगमावरी । झोळी उदकीं बुडवावी ।।२३।। आणोनियां बाहेरी । बैसोनी तेथें शिळेवरी । मग खाव्या भाकरी । ऐसा नेम चालविला ।।२४।। ऐसे लोटले कांही दिवस । सर्व शरीर झाले कृश । निशिदिनीं चिंता चित्तास । सद्गुरूप्राप्तीची लागली ।।२५।। घरदार सोडिले । वनिता पुत्रां त्यागिलें । अतितर कष्ट सोशिले । सद्गुरूकृपा नोहेची ।।२६।। हीन आपुलें प्राक्तन । भोग भोगवी दारूण । पहावे सद्गुरूचरण । ऐसें पुण्य नसेची ।।२७।। ऐसे विचार निशिदिनीं । येती बाळाप्पाचे मनीं । तथापि कष्ट सोसोनी । नित्य नेम चालविला ।।२८।। एक मास होतां निश्चिती । स्वप्नीं तीन यतिमूर्ती । येवोनिया दर्शन देती । बाळाप्पा चित्तीं सुखावें ।।२९।। पंधरा दिवस

गेल्यावरी । निद्रिस्थ असतां एके रात्रीं । एक ब्राह्मण स्वप्नाभीतरीं । येवोनिया आज्ञापी ।।३०।। अक्कलकोटीं श्रीदत्त । स्वामीरूपें नांदत । तेथें जाउनी त्वरित । कार्य इच्छित साधावें ।।३१।। पाहोनिया ऐसें स्वप्न । मनीं पावलें समाधान । म्हणती केले कष्ट दारूण । त्याचें फळ मिळेल कीं ।।३२।। अक्कलकोटीं त्वरित । जावयाचा विचार करित । तंव तयांसी एक पत्र । शय्येखालीं सापडले ।।३३।। त्यांत लिहिली एक ओळी । करूं नये उतावळी । ऐसें पाहोनी त्या वेळीं । विचार केला मानसीं ।।३४।। आपण केलें अनुष्ठान । परी तें न जाहलें पूर्ण । आणखीही कांही दिन । क्रम आपुला चालवावा ।।३५।। मग कोणे एके दिवशीं । बाळाप्पा आले संगमासी । वृक्षातळीं ठेवुनी वस्त्रासी । गेले स्नान करावया ।।३६।। परतले स्नान करोनी । सत्वर आले त्या स्थानीं । वस्त्र उचलितां खालोनी । वृश्चिक एक निघाला ।।३७।। तयासी त्यांनी न मारिलें । नित्यकर्म आटोपिलें । ग्रामामाजी परत आले । गेले भिक्षेकारणें ।।३८।। त्या दिवशीं ग्रामाभीतरीं । पक्वान्न मिळालें घरोघरीं । बाळाप्पा तोषले अंतरीं । उत्तम दिन मानिला ।।३९।। अक्कलकोटीं

जावयासी । निघाले मग त्याच दिवशीं । उत्तम शकुन तयांसी । मार्गावरी जाहले ।।४०।। चरण-चाली चालोनी । अक्कलकोटीं दुसरे दिनीं । बाळाप्पा पोंचले येवोनी । नगरी रम्य देखिली ।।४१।। जेथें नृसिंह सरस्वती । यतिरूपें वास करिती । तेथें सर्व सौख्यें नांदती । आनंद भरला सर्वत्र ।।४२।। तया नगरींच्या नारी । कामधंदा करितां घरीं । गीत गाऊनी परोपरी । स्वामीमहिमा वर्णिती ।।४३।। दूर देशींचे ब्राह्मण । वैश्यादिक इतर वर्ण । स्वामीमहिमा ऐकोन । दर्शनातें धावती ।।४४।। तयांची जाहली गर्दी । यात्रा उतरे घरोघरीं । नामघोषें ते नगरीं । रात्रंदिन गजबजे ।।४५।। राजे आणि पंडित । शास्त्री वेदान्ती येत । तैसे भिक्षुक गृहस्थ । स्वामीदर्शना कारणें ।।४६।। कानफाटे नाथपंथी । संन्यासी फकीर जती । रामदासी अघोरपंथी । दर्शना येती स्वामींच्या ।।४७।। कोणी करिती कीर्तन । गायन आणि वादन । कोणी भजनी नाचोन । स्वामीमहिमा वर्णिती ।।४८।। तया क्षेत्रींचें महिमान । केवीं वर्णू मी अज्ञान । प्रत्यक्ष जें वैकुंठभुवन । स्वामीकृपेनें जाहलें ।।४९।। पुण्यपावन देखोन नगरी । बाळाप्पा

तोषले अंतरीं । पूर्वपुण्य तयांचे पदरीं । जन्मसार्थक जाहलें ।।५०।। बाळाप्पा होऊनी सेवेकरी । स्वहस्तें करील श्रीचाकरी । ती मधुर कथा चतुरीं । पुढिले अध्यायीं परिसावी ।।५१।। जयाचा महिमा अगाध । जो केवळ सच्चिदानंद । विष्णुशंकरीं अभेद । मित्रत्व ठेवो जन्मवरी ।।५२।। इति श्रीस्वामीचरित्रसारामृत । नाना प्राकृत कथा संमत । श्रोते सदा परिसोत । एकादशोऽध्याय गोड हा ।।५३।। श्रीरस्तु ।। शुभं भवतु ।।

# ।। द्वादशोऽध्यायः ।।

श्रीगणेशाय नमः ।। कराया जगदुध्दार । हरावया भूभार । वारंवार परमेश्वर । नाना अवतार धरीतसे ।।१।। भक्तजन तारणार्थ । अक्कलकोटीं श्रीदत्त । यतिरूपें प्रगट होत । तेची समर्थ श्रीस्वामी ।।२।। गताध्यायाचे अंतीं । बाळाप्पा आले अक्कलकोटीं । पुण्य नगर पाहोनी दृष्टी । आनंद पोटीं नच मावे ।।३।। त्या दिवशीं श्रीसमर्थ । होते खासबागेंत । यात्रा आली बहुत । गर्दी जाहली श्रीजवळी ।।४।। बाळाप्पाचे मानसीं । तेव्हां चिंता पडली ऐशी । ऐशा गर्दीत आपणांसी । दर्शन कैसें होईल ।।५।। परी दर्शन घेतल्याविण । आज करूं नये भोजन । बाळाप्पाचें तनमन । स्वामीचरणीं लागलें ।।६।। दर्शनेच्छा उत्कट चित्तीं । खडीसाखर घेवोनि हातीं । गर्दीमाजी प्रवेश करिती । स्वामीसन्निध पातले ।।७।। अजानुबाहू सुहास्यवदन । श्रीस्वामीमूर्ति पाहोन । बाळाप्पानें धांवोन । दृढ चरण धरियेले ।।८।। कंठ सद्‌गदित जाहला । चरणीं भाळ ठेविला । क्षणैक मीपण

विसरला । परम तोषला मानसीं ।।९।। गंगा मीनली सागरीं । जैसे तरंग जलाभीतरी । तैसे बाळाप्पा ते अवसरीं । स्वामीचरणी दृढ झाले ।।१०।। मधुस्तव भ्रमर जैसा । कमलपुष्प न सोडी सहसा । स्वामी चरणीं बाळाप्पा तैसा । दृढ जडला स्वभावें ।।११।। येवोनिया भानावरती । श्रीचरणांची सोडिली मिठी । ब्रह्मानंद न माये पोटीं । स्तोत्र ओठीं गातसे ।।१२।। श्रीसमर्थ त्यावेळीं । पडले होते भूतळीं । उठोनिया काय केली । लीला एक विचित्र ।।१३।। सर्व वृक्षांसी आलिंगन । दिलें त्यांनी प्रेमें करोन । बाळाप्पावरचें प्रेम । ऐशा कृतींने दाविले ।।१४।। धन्यता मानोनी मनीं । बाळाप्पा निघाले तेथोनी । परी तयांचे श्रीचरणीं । चित्त गुंतलें अखंड ।।१५।। त्यांसवें एक जहागिरदार । ते होते बिन्हाडावर । स्वयंपाक करोनी तयार । म्हणती जाऊं दर्शना ।।१६।। बाळाप्पा दर्शन करोन । आले बिन्हाडी परतोन । जहागिरदारें नैवेद्य काढोन । बाळाप्पा हातीं दिधला ।।१७।। म्हणती जाऊनी स्वामीसी । अर्पण करा नैवेद्यासी । अवश्य म्हणोनि तयांसी। बाळाप्पा तेव्हा चालले ।।१८।। म्हणती नैवेद्य दाखवून । मग करूं प्रसाद भक्षण ।

मार्गी तयांसी वर्तमान । विदित एक जाहलें ।।१९।। या समयीं श्रीसमर्थ । असती नृपमंदिरांत । राजाज्ञेवांचुनी तेथ । प्रवेश कोणाचा न होय ।।२०।। ऐसें ऐकुनी वर्तमान । बाळाप्पा मनीं झाले खिन्न । म्हणती आज नैवेद्यार्पण । आपुल्या हस्तें नोहेची ।।२१।। मार्गावरूनी परतले । सत्वर बिऱ्हाडावरी आले । तेथें नैवेद्यार्पण केलें । मग सारिलें भोजन ।।२२।। नित्य प्रातःकाळीं उठोन । षट्कर्माते आचरोन। घेवोनी स्वामीदर्शन । जपालागीं बैसावें ।।२३।। श्रीशंकर उपास्य दैवत । त्याचें करावें पूजन नित्य । माध्यान्हीं येता आदित्य । जपानुष्ठान आटपावें ।।२४।। करीं झोळी घेवोनी । श्रीस्वामीजवळी येवोनी । मस्तक ठेवोनि चरणीं । जावें भिक्षेकारणें ।।२५।। मागोनिया माधुकरी । मग यावें बिऱ्हाडावरी । जी मिळेल भाजीभाकरी । त्यानें पोट भरावे ।।२६।। घ्यावें स्वामीदर्शन । मग करावें अनुष्ठान ।। ऐशा प्रकारे करोन । अक्कलकोटीं राहिले ।।२७।। चोळाप्पा आदीकरोन। सेवेकरी बहुतजण । त्यांत सुंदराबाई म्हणून । मुख्य होती त्यावेळीं ।।२८।। आपण व्हावें सेवेकरी । इच्छा बाळाप्पाचे अंतरीं । सुंदराबाईचिये

करीं । आधिपत्य सर्व असे ।।२९।। एके दिवशीं तयांसी । बाई आज्ञा करी ऐशी । आपणही श्रीसेवेसी । करीत जावें आनंदें ।।३०।। बाळाप्पा मनी आनंदला । म्हणे सुदिन आज उगवला । सद्‌गुरूसेवेचा लाभ झाला । जाहलें सार्थक जन्माचें ।।३१।। बहुतजण सेवेकरी । बाई मुख्य त्यांमाझारीं । सर्व अधिकार तिच्या करीं । व्यवस्थेचा होता पैं ।।३२।। मी प्रिय बहू स्वामीसी । ऐसा अभिमान तियेसी । गर्वभरें इतरांसी । तुच्छ मानूं लागली ।।३३।। या कारणें आपसांत । भांडणे होतीं सदोदीत । स्वामीसेवेची तेथ । अव्यवस्था होतसे ।।३४।। हें बाळाप्पांनीं पाहोन । नाना युक्ती योजून । मोडुनी टाकिलें भांडण । एकचित्त सर्व केले ।।३५।। कोठेंही असतां समर्थ । पूजादिक व्हावया यथार्थ । तत्संबंधी सर्व साहित्य । बाळाप्पा सिध्द ठेविती ।।३६।। समर्थांच्या येतां चित्तीं । अरण्यांतही वस्ती करिती । परी तेथेंही पूजा आरती । नियमें करिती बाळाप्पा ।।३७।। बाळाप्पाची प्रेमळ भक्ती । पाहुनी संतोष स्वामीप्रती । दृढ भाव धरूनी चित्तीं । सेवा करिती आनंदे ।।३८।। ऐसे लोटतां कांहीं दिवस । बाळाप्पाचिया शरीरास ।

व्याधी जडली रात्रंदिवस । चैन नसे क्षणभरी ।।३९।। बेंबीमधुनिया रक्त । वहातसे दिवसरात्र । तया दुःखें विव्हळ होत । म्हणती कैसें करावें ।।४०।। भोग भोगिला कांही दिन । कागदाची पुडी बेंबीतुन । पडली ती पाहतां उकलोन । विष त्यांत निघालें ।।४१।। पूर्वी कोण्या कृतघ्नें । बाळाप्पासी यावें मरण । विष दिधलें कानोल्यांतुन । पडलें आज बाहेर ।।४२।। स्वामीकृपेनें आजवरी । गुप्त राहिलें होतें उदरीं । सद्‌गुरूसेवा त्यांचे करीं । व्हावी लिखित विधीचें ।।४३।। आजवरी बहुतांपरी । बाळाप्पा करी चाकरी । तयाचें अंतर परी । स्वामीमय न जाहलें ।।४४।। प्रत्येक सोमवारीं तयांनी । महादेवाची पूजा करोनी । मग यावें परतोनी । स्वामीसेवेकारणें ।।४५।। हें पाहोनी एके दिवसी । बाई विनवी समर्थांसी । आपण सांगूनी बाळाप्पासी । शंकरपूजनीं वर्जावें ।।४६।। तैशी आज्ञा तयाप्रती । एके दिनीं समर्थ करिती । परी बाळाप्पाचे चित्तीं । विश्वास काहीं पटेना ।।४७।। बाईच्या आग्रहावरून । समर्थे दिली आज्ञा जाण । हें नसेल सत्य पूर्ण । विनोद केला निश्चयें ।।४८।। पूजा करणें उचित । न करावी हेंचि सत्य ।

यापरी चिठ्ठ्या लिहित । प्रश्न पहात बाळाप्पा ।।४९।। एक चिठ्ठी तयांतुन । उचलुनी पाहतां वाचून । न करावेंची पूजन । तियेमाजी लिहिलेसे ।।५०।। तेव्हां सर्व भ्रांती फिटली । स्वामीआज्ञा सत्य मानिली । ही भानगड पाहिली । श्रीपाद भटजीने ।।५१।। समर्थांचा पूर्ण भक्त । चोळाप्पा नामें विख्यात । तयाचा हा जामात । श्रीपादभट्ट जाणिजे ।।५२।। स्वामीपुढें भक्तजन । ठेविती द्रव्यादिक आणोन । तें सुंदराबाई उचलोन । नेत असे सत्वर ।।५३।। त्यामुळें चोळाप्पाप्रती । अल्प होई द्रव्यप्राप्ती । बाळाप्पामुळें म्हणती । नुकसान होतें आपुलें ।।५४।। तेव्हां जामात श्वशुर । उभयतां करिती विचार । बाळाप्पातें आतां दूर । केलें पाहिजे युक्तीनें ।।५५।। श्रीपादभट्ट एके दिवशीं । काय बोलती बाळाप्पासी । दारा-पुत्र सोडुनी देशीं । आपण येथे राहिलां ।।५६।। आपण आल्यापासोन । आमुचें होतें नुकसान । ऐसे बोल ऐकोन । बाळाप्पा मनीं खिन्न झाला ।।५७।। बाळाप्पा बोले वचन । तुमचें अन्न खावोन । करितो तुमचें नुकसान । व्यर्थ माझा जन्म हा ।।५८।। स्वामींनी मज आज्ञा द्यावी । मी जातों आपुल्या गांवी । परी तुम्हीं युक्ती योजावी ।

आज्ञा होईल ऐशीच ।।५९।। श्रीपादभट्टें एके दिवशीं । विचारिलें समर्थांसी । कुलदेवतेच्या दर्शनासी । जावया इच्छी बाळाप्पा ।।६०।। ऐसें ऐकुनिया समर्थ । हास्यमुखें काय बोलत । कुलदेवतेचे दर्शन नित्य । बाळाप्पा येथे करीतसे ।।६१।। तेव्हां निरुत्तर जाहला । ऐसा उपाय खुंटला । मग तयानें पाहिला । कारभार चिठ्ठ्यांचा ।।६२।। तयानें पुसिलें वर्तमान । बाळाप्पा सांगे संपूर्ण । श्रीपादभट्टें ऐकोन । कापट्य मनीं आणिलें ।।६३।। म्हणे जावया आपणासी । समर्थ न देती आज्ञेसी । तरी टाकुनी चिठ्ठ्यांसी । आज्ञा घ्यावी आपण ।।६४।। तयाचें कपट न जाणोनी । अवश्य म्हणे त्याच दिनीं । दोन चिठ्ठ्या लिहोनी । उभयतांनी टाकिल्या ।।६५।। चिठ्ठी आपुल्या करीं । भटजी उचली सत्वरी । येथें राहुनी चाकरी । करी ऐसें लिहिलेंसे ।।६६।। भटजी मनीं खिन्न झाला । सर्व उपाय खुंटला । महाराज आतां बाळाप्पाला । न सोडितील निश्चयें ।।६७।। स्वामीचरणीं दृढ भक्ती । बाळाप्पाची जडली होती । कैसा दूर तयाप्रती । करितील यती दयाळ ।।६८।। जे केवळ दयाघन । भक्तकाजकल्पद्रुम । विष्णु शंकर दोघेजण ।

तयांसी शरण सदैव ।।६९।। इति श्रीस्वामीचरित्र सारामृत। नाना प्राकृत कथा संमत । सदा प्रेमळ परिसोत । द्वादशोऽध्याय गोड हा ।।७०।। श्रीराजाधिराज योगीराज श्रीस्वामीसमर्थ महाराजार्पणमस्तु ।।

# ।। त्रयोदशोऽध्यायः ।।

श्रीगणेशाय नमः । शुक्लपक्षीचा शशिकर । वाढे जैसा उत्तरोत्तर । तैसें हें स्वामीचरित्र । अध्यायाध्यायीं वाढलें ।।१।। द्वादशोध्यायाचे अंतीं । श्रीपादभट्ट बाळाप्पाप्रती । कपट युक्तींने फसवूं पाहती । परी झालें व्यर्थची ।।२।। खिन्न झाला चोळाप्पा । म्हणे श्रींची पूर्ण कृपा । मजहुनी तयां बाळाप्पा । प्रिय असे जाहला ।।३।। वर्तलें ऐसें वर्तमान । बाळाप्पा एकनिष्ठा धरोन । स्वामीसेवा रात्रंदिन । अत्यानंदें करीतसे ।।४।। स्वयंपाकादिक करावयासी । लज्जा वाटतसे त्यासी । तयातें एके समयासी । काय बोलती समर्थ ।।५।। निर्लज्जासी सन्निध गुरू । असे जाण निरंतरू । ऐसें बोलतां सद्‌गुरू । बाळाप्पा मनीं समजला ।।६।। अनेक उपायें करोन । शुध्द केलें बाळाप्पाचें मन । स्वामीविणें दैवत अन्य । नसेचि थोर या जगीं ।।७।। सेवेकऱ्यांमाजी वरिष्ठ । सुंदराबाई होती तेथ । तिनें सेवेकऱ्यांस नित्य । त्रास द्यावा व्यर्थची ।।८।। नाना प्रकार बोलोन । करी सर्वांचा अपमान ।

परी बाळाप्पावरी पूर्ण । विश्वास होता तियेचा ।।९।। परी कोणे एके दिवशीं मध्यरात्रीच्या समयासी । लघुशंका लागतां स्वामीसी । बाळाप्पातें उठविलें ।।१०।। श्रीते धरोनिया करीं । घेऊनी गेले बाहेरी । पाहोनिया ऐशी परी । बाई अंतरी कोपली ।।११।। म्हणे यानें येवोन । स्वामी केले आपणा आधीन । माझें गेलें श्रेष्ठपण । अपमान जहाला ।।१२।। तैंपासुनी बाळाप्पासी । त्रास देत अहर्निशीं गाऱ्हाणें सांगतां समर्थांसी । बाईतें शब्दें ताडिती ।।१३।। अक्कलकोटीं श्रीसमर्थ । प्रथमतः ज्याचे घरीं येत । तो चोळाप्पा विख्यात । स्वामीभक्त जाहला ।।१४।। एक तपपर्यंत । स्वामीसेवा तो करीत । तयासी द्रव्याशा बहुत । असे सांप्रत लागली ।।१५।। दिवाळीचा सण येत । राजमंदिरामाजी समर्थ । राहिले असतां आनंदात । वर्तमान वर्तलें ।।१६।। कोण्या भक्तें समर्थांसी । अर्पिलें होतें चंद्रहारासी । सणानिमित्त त्या दिवशी । अंगावरी घालावा ।।१७।। राणीचिये मनांत । विचार येतां त्वरित । सुंदराबाईसी बोलत । चंद्रहार द्यावा कीं ।।१८।। सुंदराबाई बोलली । तो आहे चोळाप्पाजवळी । ऐसे ऐकतां त्याकाळी । जमादार

पाठविला ।।१९।। गंगुलाल जमादार । चोळाप्पाजवळी ये सत्वर । म्हणे द्यावा जी चंद्रहार । राणीसाहेब मागती ।।२०।। चोळाप्पा बोले तयासी । हार नाहीं आम्हांपासी । बाळाप्पा ठेवितो तयासी । तुम्हीं मागून घ्यावा कीं ।।२१।। ऐसें ऐकुनी उत्तर । गंगुलाल जमादार । बाळाप्पाजवळी येउनी सत्वर । हार मागूं लागला ।।२२।। बाळाप्पा बोले उत्तर । आपणापासीं चंद्रहार । परी चोळाप्पाची त्यावर । सत्ता असे सर्वस्वें ।।२३।। ऐसें ऐकुनी बोलणें । जमादार पुसे चोळाप्पाकारणें । जबाब दिधला चोळाप्पानें । बाळाप्पा देती तरी घेइजे ।।२४।। ऐसें भाषण ऐकोन । जमादार परतोन । नृपमंदिरीं येवोन । वर्तमान सर्व सांगे ।।२५।। चोळाप्पाची ऐकुनी कृती । राग आला राणीप्रती । सुंदराबाईनेंही गोष्टी । तयाविरूध्द सांगितल्या ।।२६।। कारभार चोळाप्पाचे करीं । जो होता आजवरी । तो काढुनी त्यास दूरी । करावें राणी म्हणतसे ।।२७।। पहिलेंच होतें बाईच्या मनीं । साहाय्य झाली आतां राणी । सुंदराबाईंचा गगनीं । हर्ष तेव्हां न समावे ।।२८।। चोळाप्पानें आजवरी । केली समर्थांची चाकरी । धनप्राप्ती तया

भारी । समर्थकृपेनें होतसे ।।२९।। असो एके अवसरीं । काय झाली नवलपरी । बैसली समर्थांची स्वारी । भक्तमंडळी वेष्टित ।।३०।। एक वस्त्र तया वेळीं । पडलें होतें श्रींजवळी । तयाची करोनिया झोळी । समर्थे करी घेतली ।।३१।। अल्लख शब्द उच्चारिला । म्हणती भिक्षा द्या आम्हांला । तया वेळी सर्वत्रांला । आश्चर्य वाटलें ।।३२।। झोळी घेतली समर्थे । काय असे उणे तेथें । जे जे दर्शना आले होते । त्यांनी भिक्षा घातली ।।३३।। कोणी एक कोणी दोन । रूपये टाकिती आणोन । न लागतां एक क्षण । शंभरांवर गणती झाली ।।३४।। झोळी चोळाप्पातें देवोन । समर्थ बोलले काय वचन । चोळाप्पा तुझें फिटलें रीण । स्वस्थ आतां असावें ।।३५।। पाहोनियां द्रव्यासी । आनंद झाला तयासी । परी न आलें मानसीं । श्रीचरण अंतरलें ।।३६।। तयासी झाले मास दोन । पुढें काय झालें वर्तमान । राणीच्या आज्ञेनें शिपाई दोन । स्वामीजवळी पातले ।।३७।। त्यांनीं उठवून चोळाप्पासी । आपण बैसले स्वामीपासी । चोळाप्पाच्या मानसीं । दुःख फार जाहलें ।।३८।। स्वामीपुढें वस्तू येती । त्या शिपाई उचलिती । चोळाप्पातें कांहीं

न देती । ने तरी घेती हिरावोनी ।।३९।। चोळाप्पासी दूर केलें । बाईसी बरें वाटलें । ऐसे कांहीं दिवस गेले । बाळाप्पा सेवा करिताती ।।४०।। कोणे एके अवसरीं । सुंदराबाई बाळाप्पावरी । रागावोनी दुष्टोत्तरीं । ताडण करी बहुसाळ ।।४१।। तें ऐकोनी बाळाप्पासी । दुःख झालें मानसीं । सोडुनी स्वामी-चरणांसी । म्हणती जावें येथोनी ।।४२।। ऐसा केला विचार । जाहली असतां रात्र । बाळाप्पा गेले बिऱ्हाडावर । खिन्न झाले मानसीं ।।४३।। आज्ञा समर्थांची घेवोनी । म्हणती जावें येथोनी । याकरितां दुसरे दिनीं । समर्थांजवळी पातले ।।४४।। आपुली आज्ञा घ्यावयासी । बाळाप्पा येतो या समयासी । अंतर्ज्ञानी समर्थांसी । तात्काळ विदित जहालें ।।४५।। तेव्हां एका सेवेकऱ्यास । बोलले काय समर्थ । बाळाप्पा दर्शनासी येत । त्यांसी आसन दाखवावें ।।४६।। बाळाप्पा येतां त्या स्थानीं । आसन दाविलें सेवेकऱ्यांनी । तेव्हां समजले निजमनीं । आज्ञा आपणा मिळेना ।।४७।। कोठें मांडावें आसन । विचार पडला त्यांलागून । तों त्याच रात्रीं स्वप्न । बाळाप्पानें देखिलें ।।४८।। श्रीमारुतीचें मंदिर । स्वप्नी आलें

सुंदर । तेथें जाउनी सत्वर । आसन त्यांनी मांडिलें ।।४९।। ''श्रीस्वामीसमर्थ'' । या मंत्राचा जप करीत । एक वेळ दर्शना येत । हिशेब ठेवित जपाचा ।।५०।। काढुनी दिलें बाळाप्पासी । आनंद झाला बाईसी । गर्वभरें ती कोणासी । मानीनाशी जाहली ।।५१।। सुंदराबाईसी करावें दूर । समर्थांचा झाला विचार । त्याप्रमाणें चमत्कार । करोनियां दाविती ।।५२।। जे कोणी दर्शना येत । त्यांसी बाई द्रव्य मागत । धन-धान्य सांठवित । ऐशा प्रकारें करोनी ।।५३।। बाईचीं कृत्यें दरबारीं। विदित केलीं थोर थोरीं । बाईनें रहावें दूरी । श्रीचरणापासुनी ।।५४।। परी राणीची प्रीति । बाईवरी बहुत होती । याकारणें कोणाप्रती । धैर्य कांहीं होईना ।।५५।। अक्कलकोटीं त्या अवसरीं । माधवराव बर्वे कारभारी । तयांसी हुकूम झाला सत्वरी। बाईसी दुरी करावें ।।५६।। परी राणीसी भिवोनी । तैसें न केलें तयांनी । समर्थदर्शनासी एके दिनीं । कारभारी पातले ।।५७।। तयांसी बोलती समर्थ । कैसा करितां कारभार । ऐसें ऐकोनिया उत्तर । बर्वे मनी समजले ।।५८।। मग त्यांनी त्याच दिवशीं । पाठविले फौजदारासी । कैद करूनीया बाईसी । आणावें

म्हणती सत्वर ।।५९।। आज्ञेप्रमाणें सत्वर । बाईसी बांधी फौजदार । बाई करी शोक फार । घेत ऊर बडवूनी ।।६०।। फौजदारासी समर्थ । कांही एक न बोलत । कारकिर्दीचा अंत । ऐसा झाला बाईच्या ।।६१।। स्वामीचिया सेवेकरितां । सरकारांतुनी तत्वतां । पंच नेमुनी व्यवस्था । केली असे नृपराये ।।६२।। मग सेवा करावयासी । घेउनी गेले बाळाप्पासी । म्हणती देऊं तुम्हांसी । पगार सरकारांतुनी ।।६३।। बाळाप्पा बोलले तयांसी । द्रव्याशा नाहीं आम्हासी । आम्ही निर्लोभ मानसीं । स्वामीसेवा करूं कीं ।।६४।। बाळाप्पाचा जप होतां पूर्ण । एका भक्तास सांगोन । करविलें श्रींनीं उद्यापन । हिशेब जपाचा घेतला ।।६५।। बाळाप्पांनीं चाकरी । एक तप सरासरी । केली उत्तम प्रकारी । समर्था ते प्रिय झाले ।।६६।। अक्कलकोट नगरात । अद्यापि बाळाप्पा रहात । श्री पादुकांची पूजा करीत । निराहार राहोनि ।।६७।। जे जे झाले स्वामीभक्त । त्यांत बाळाप्पा श्रेष्ठ । तयांवरी श्रीसमर्थ । करीत होते प्रेम बहु ।।६८।। ऐसें बाळाप्पाचे चरित्र । वर्णिलें असे संकलित । स्वामीचरित्रसारामृतांत । चरित्रसार घेतलें ।।६९।। दृढ

निश्चय आणि भक्ती । तैसी सद्गुरूचरणीं आसक्ती । तेणें येत मोक्ष हातीं । अन्य साधनें व्यर्थची ।।७०।। दृढनिश्चयाचें उदाहरण । हें चरित्र असे पूर्ण । श्रोतीं होउनी सावधान । श्रवणीं आदर धरावा ।।७१।। उगीच करिती दांभिक भक्ती । त्यावरी स्वामी कृपा न करिती । सद्भावें जे नमस्कारिती । त्यांवरी होती कृपाळू ।।७२।। पुढले अध्यायीं सुंदर कथा । ऐका श्रोते देउनी चित्ता । जेणें निवारे सर्व व्यथा । पापराशी दग्ध होती ।।७३।। अक्कलकोटनिवासिया । जयजयाजी स्वामीराया । रात्रंदिन तुझ्या पायां । विष्णु शंकर वंदिती ।।७४।। इतिश्रीस्वामीचरित्र सारामृत। नाना प्राकृत कथा संमत । सदा भक्त परिसोत । त्रयोदशोध्याय गोड हा ।।७५।। इति श्रीस्वामीचरित्रसारामृत त्रयोदशोऽध्यायः ।। श्रीस्वामीचरणार्पणमस्तु ।। शुभं भवतु ।।

# ।। चतुर्दशोऽध्यायः ।।

श्रीगणेशाय नमः ।। जयजयाजी करूणाघना । जयजयाजी अघशमना । जयजयाजी परमपावना । दीनबंधो जगद्‌गुरू ।।१।। आपुल्या कृपें निश्चित । त्रयोदश अध्यायापर्यंत । वर्णिलें स्वामीचरित्रामृत । आतां पुढें वदवावें ।।२।। आपुल्या कथा वदावया । बुध्दी देई स्वामीराया । चरित्र ऐकोनी श्रोतयां । संतोष होवो बहुसाळ ।।३।। कैसी करावी आपुली भक्ती । हें नेणें मी मंदमती । परी प्रश्न करितां श्रोतीं । अल्पमती सांगतसे ।।४।। प्रातःकाळीं उठोन । आधीं करावें नामस्मरण । अंतरीं ध्यावे स्वामीचरण । शुध्दमन करोनी ।।५।। प्रातःकर्मे आटपोनी । मग बैसावें आसनीं । भक्ती धरोनी स्वामीचरणीं । पूजन करावें विधियुक्त ।।६।। एकाग्र करोनी मन । घालावें शुध्दोदक स्नान । सुगंध चंदन लावोन । सुवासिक कुसुमें अर्पावीं ।।७।। धूप-दीप-नैवेद्य । फल तांबूल दक्षिणा शुध्द । अर्पावें नाना खाद्य । नैवेद्याकारणें स्वामींच्या ।।८।। षोडशोपचारें पूजन ।

करावें सद्भावें करून । धूप-दीपार्ती अर्पून । नमस्कार करावा ।।९।। जोडोनियां दोन्ही कर । उभें रहावें समोर । मुखें म्हणावे प्रार्थना स्तोत्र । नाममंत्र श्रेष्ठ पैं ।।१०।। अजानुबाहू सुहास्यवदन । काषायवस्त्र परिधान । भव्य आणि मनोरम । मूर्ती दिसे साजिरी ।।११।। मग करावी प्रार्थना । जयजयाजी अघहरणा । परात्परा कैवल्यसदना । ब्रह्मानंदा यतिवर्या ।।१२।। जयजयाजी पुराणपुरूषा । लोकपाला सर्वेशा । अनंत ब्रह्मांडाधीशा । वेदवंद्या जगद्गुरू ।।१३।। सुखधामनिवासिया । सर्वसाक्षी करूणालया । भक्तजन ताराया । अनंतरूपें नटलासी ।।१४।। तूं अग्नी तूं पवन । तूं आकाश तूं जीवन । तूंची वसुंधरा पूर्ण । चंद्र सूर्य तूंच पैं ।।१५।। तूं विष्णु आणि शंकर । तूं विधाता तूं इंद्र । अष्टदिक्पालादि समग्र । तूंच रूपें नटलासी ।।१६।। कर्ता आणि करविता । तूंच हवी आणि होता। दाता आणि देवविता । तूंच समर्था निश्चयें ।।१७।। जंगम आणि स्थिर । तूंच व्यापिलें समग्र । तुजलागीं आदिमध्याग्र । कोठें नसे पाहतां ।।१८।। असोनियां निर्गुण । रूपें नटलासी सगुण । ज्ञाता आणि

ज्ञान । तूंच एक विश्वेशा ।।१९।। वेदांचाही तर्क चांचरे । शास्त्रांतेंही नावरे । विष्णु शंकर एकसरें । कुंठित झाले सर्वही ।।२०।। मी केवळ अल्पमती । करूं केवीं आपुली स्तुती । सहस्त्रमुखही निश्चिती । शिणला ख्याती वर्णितां ।।२१।। दृढ ठेविला चरणीं माथा । रक्षावें मजसी समर्था । कृपाकटाक्षें दीनानाथा । दासाकडे पहावें ।।२२।। आतां इतुकी प्रार्थना । आणावी जी आपुल्या मना । कृपासमुद्रीं या मीना । आश्रय देईजे सदैव ।।२३।। पाप ताप आणि दैन्य । सर्व जावो निरसोन । इहलोकीं सौख्य देवोन । परलोकसाधन करवावें ।।२४।। दुस्तर हा भवसागर । याचें पावावया पैलतीर । त्वन्नाम तरणी साचार । प्राप्त होवो मजला ते ।।२५।। आशा मनीषा तृष्णा । कल्पना आणि वासना । भ्रांती भुली नाना । न बाधोत तुझ्या कृपें ।।२६।। किती वर्णू आपुले गुण । द्यावें मज सुख साधन । अज्ञान तिमिर निरसोन । ज्ञानार्क हृदयीं प्रगटों पैं ।।२७।। शांती मनीं सदा वसो । वृथाभिमान नसो । सदा समाधान वसो । तुझ्या कृपेनें अंतरीं ।।२८।। भवदुःख हें निरसो । तुझ्या भजनीं चित्त वसो । वृथा विषयांची नसो । वासना या

मनातें ।।२९।। सदा साधु-समागम । तुझें भजन उत्तम । तेणें होवो हा सुगम । दुर्गम जो भवपंथ ।।३०।। व्यवहारी वर्ततां । न पडो भ्रांती चित्ता । अंगी न यावी असत्यता । सत्यें विजयी सर्वदा ।।३१।। आप्तवर्गाचें पोषण । न्याय मार्गावलंबन । इतुकें द्यावें वरदान । कृपा करूनि समर्था ।।३२।। असोनियां संसारांत । प्राशीन तव नामामृत । प्रपंच आणि परमार्थ । तेणें सुगम मजलागीं ।।३३।। ऐशी प्रार्थना करितां । आनंद होय समर्था । संतोषोनी तत्वतां । वरप्रसाद देतील ।।३४।। गुरूवारीं उपोषण । विधियुक्त करावें स्वामीपूजन । प्रदोषसमय होतां जाण । उपोषण सोडावे।।३५।। तेणें वाढेल बुध्दी । सत्यसत्य हें त्रिशुध्दी । अनुभवाची प्रसिध्दी । करिताती स्वामीभक्त ।।३६।। ‘‘श्रीस्वामी समर्थ’’ । ऐसा षडाक्षरी मंत्र । प्रीतीनें जपावा अहोरात्र । तेणें सर्वार्थ पाविजे ।।३७।। ब्राह्मण क्षत्रियांदिकां लागोनी । मुख्य जप हा चहूंवर्णीं । स्त्रियांनींही निशिदिनीं । जप याचा करावा ।।३८।। प्रसंगीं मानसपूजा करितां । तेही प्रिय होय समर्था । स्वामीचरित्र वाचितां ऐकतां । सकल दोष जातील ।।३९।। कैसी करावी स्वामीभक्ती । हें

नेणें मी मंदमती । परी असतां शुध्दचित्तीं । तेची भक्ती श्रेष्ठ पैं ।।४०।। आम्हीं आहों स्वामीभक्त । मिरवूं नये लोकांत । जयासी भक्तीचा दंभ व्यर्थ । निष्फळ भक्ती तयाची ।।४१।। दंभें षोडशोपचारें पूजितां । परी प्रिय नव्हेचि समर्था । भावें पत्र-पुष्प अर्पितां । समाधान स्वामीतें ।।४२।। जयजयाजी आनंदकंदा । जयजयाजी करूणासमुद्रा । विष्णु शंकराचिया छंदा । कृपा करोनी पुरवावें ।।४३।। इति श्रीस्वामीचरित्रसारामृत । नाना प्राकृत कथा संमत । सदा ऐकोत भाविक भक्त । चतुर्दशोऽध्याय गोड हा ।।४४।। श्रीरस्तु ।। शुभं भवतु ।।

# ।। पंचदशोऽध्यायः ।।

श्रीगणेशाय नमः । नलगे करणें तीर्थाटन । हठयोगादिक साधन । वेदाभ्यास शास्त्रज्ञान । मोक्षसाधनाकारणें ।।१।। अंतरीं स्वामीभक्ती जडतां । चारी पुरूषार्थ येती हाता । पाप ताप दैन्य वार्ता । तेथें कांहीं नुरेची ।।२।। वर्तत असतां संसारीं । स्वामीपद आठवी अंतरीं । तयातें या भवसागरीं । निश्चयें तारिती समर्थ ।।३।। सर्व कामना पुरवोन । अंतीं दाविती सुरभुवन । जे नर करिती नामस्मरण । ते मुक्त याच देहीं ।।४।। मंगळवेढें ग्रामात । रहात असतां श्रीसमर्थ । ग्रामवासी जन समस्त । वेडा म्हणती तयांसी ।।५।। आपुली व्हावी प्रख्याती । हे नसेची जयाच्या चित्तीं । स्वेच्छें वर्तन करिती । कांहीं न जाणती जनवार्ता ।।६।। कोणासी भाषण न करिती । कवणाचे गृहा न जाती । दुष्टोत्तरे जन ताडिती । तरी क्रोध नयेची ।।७।। शीतोष्णाची भीती । नसेची ज्यांचिया चित्तीं । सदा अरण्यांत वसती । एकान्त स्थळीं समर्थ ।।८।। सुखदुःख समान । सदा तृप्त असे मन । लोकवस्ती आणि वन ।

दोन्ही जयां सारखीं ।।९।। परमेश्वररूप यती । ऐसें ज्यांच्या वाटे चित्तीं । ते करितां स्वामीभक्ती । जन हांसती तयांतें ।।१०।। त्या वेळी मंगळवेढ्यांत । बसाप्पा तेली रहात । दारिद्र्यें पीडिला बहुत । दीन स्थिती तयाची ।।११।। बसाप्पा व्यवसाय करी । पुरें न पडे त्यामाझारीं । अठराविश्वें दारिद्र्य घरीं । पोटा भाकरी मिळेना ।।१२।। तो एके दिनीं फिरत फिरत । सहज वनामाजी जात । तों देखिले श्रीसमर्थ । दिगंबर यतिराज ।।१३।। कंटकशय्या करोन । तियेवरी केलें शयन । ऐसें नवल देखोन । लोटांगण घालितसे ।।१४।। अंतरी पटली खूण । यती ईश्वरांश पूर्ण । म्हणुनी सुखें शयन । कंटकशय्येवरी केलें ।।१५।। अष्टभावें दाटोनी । माथा ठेवी श्रीचरणीं । म्हणें कृपाकटाक्षें करोनी । दासाकडे पहावें ।।१६।। स्वामीचरणांचा स्पर्श होतां । ज्ञानी झाला तो तत्त्वतां । कर जोडोनियां स्तविता । झाला बहुत प्रकारे ।।१७।। सकल ब्रह्मांड नायका । कृपाघना भक्तपालका । पाप ताप दैन्य हारका । विश्वपते जगद्गुरू ।।१८।। पाहुनियां प्रेमळ भक्ती । अंतरीं संतोषले यती । वरदहस्त ठेविती । तात्काळ मस्तकीं

तयांचे ॥१९॥ बसाप्पांचे श्रीचरणीं । मन जडलें तैं पासोनी । राहूं लागला निशिदिनीं । स्वामीसन्निध आनंदें ॥२०॥ जिकडे जातील समर्थ । तिकडे आपणही जात । ऐसें पाहुनी हांसत । कुटिल जन तयांतें ॥२१॥ वेड्याच्या नादीं लागला । संसार यानें सोडिला । घरदार विसरला । वेडा झाला निश्चयें ॥२२॥ मग बसाप्पाची कांता । ऐकुनियां ऐशी वार्ता । करीतसे आकांता । म्हणे घर बुडालें ॥२३॥ आधींच आम्हीं निर्धन । परी मोलमजुरी करोन । करीत होतों उपजीवन । आतां काय करावें ॥२४॥ बसाप्पा येतां गृहासी । दुष्टोत्तरें बोले त्यासी । म्हणें सोडिलें संसारासी । वेड काय लागलें ॥२५॥ परी बसाप्पाचें चित्त । स्वामीचरणीं आसक्त । जनापवादा न भीत । नसे चाड कोणाची ॥२६॥ ऐसे लोटले कांही दिन । काय झालें वर्तमान । तें होवोनी सावधान । चित्त देउनी ऐकावें ॥२७॥ एके दिवशीं अरण्यांत । बसाप्पा स्वामीसेवा करीत । तंव झाली असे रात । घोर तम दाटलें ॥२८॥ चित्त जडलें श्रीचरणीं । भीती नसे कांहीं मनीं । दोन प्रहर होतां रजनी । समर्थ उठोनी चालले ॥२९॥ पुढे जातां समर्थ ।

बसाप्पा मागें चालत । प्रवेशले घोर अरण्यांत । क्रूर श्वापदें ओरडती ।।३०।। आधींच रात्र अंधारी । वृक्ष दाटले नाना परी । मार्ग न दिसे त्या माझारीं । चरणीं रूतती कंटक ।।३१।। परी बसाप्पाचे चित्तीं । न वाटे कांहीं भीती । स्वामीचरणीं जडली वृत्ती । देहभान नसेची ।।३२।। तों समर्थें केलें नवल । प्रगट झाले असंख्य व्याल । भूभाग व्यापिला सकळ । तेजें अग्नीसमान ।।३३।। पादस्पर्श सर्पा झाला । बसाप्पा भानावरी आला । अपरिमित देखिला । सर्पसमूह चोहींकडे ।।३४।। वृक्ष शाखा अवलोकित । तों सर्पमय दिसत । मागें पुढें पहात । तों दिसत सर्पमय ।।३५।। पाहोनियां ऐशी परी । भयभीत झाला अंतरीं । तों तयासी मधुरोत्तरीं । समर्थ काय बोलले ।।३६।। भिऊं नको या समयीं । जितुकें पाहिजे तितुकें घेई । न करी अनुमान कांहीं । दैव तुझें उदेलें ।।३७।। ऐसें बोलतां समर्थ बसाप्पा भय सोडुनी त्वरित । करीं घेवोनि अंगवस्त्र । टाकीत एका सर्पावरी ।।३८।। गुंडाळोनी सर्पा त्वरित । सत्वर उचलोनी घेत । तंव सर्व सर्प झाले गुप्त । तेजही नष्ट जाहलें ।।३९।। तेथोनियां परतले । सत्वर ग्रामामाजी

आले । बसाप्पासहित बैसले । समर्थ एका देऊळीं ।।४०।। तेथें आपुलें अंगवस्त्र । बसाप्पा सोडोनी पहात । तंव त्यांत सुवर्ण दिसत । सर्प गुप्त जाहला ।।४१।। ऐसें नवल देखोनी । चकित झाला अंतःकरणीं । माथा ठेवी स्वामीचरणीं । प्रेमाश्रु नयनीं वहाती ।।४२।। त्यासी बोलती यतीश्वर । घरीं जावें त्वां सत्वर । सुखें करावा संसार । दारा पुत्रां पोशिजे ।।४३।। आनंदोनी मानसीं । बसाप्पा गेला गृहासी । वर्तमान सांगतां कांतेसी । तेही अंतरीं सुखावे ।।४४।। कृपा होतां समर्थांची । वार्ता नुरेची दैन्याची । याविषयीं ही बसाप्पाची । गोष्ट साक्ष देतसे ।।४५।। असो तो बसाप्पा भक्त । संसारसुख उपभोगित । रात्रंदिन ‘‘श्रीस्वामीसमर्थ’’ । मंत्र जपे अत्यादरें ।।४६।। पाप ताप आणि दैन्य । ज्यांचे दर्शनें निरसोन । जाय ते पद रात्रंदिन । प्रेमें विष्णु शंकर ध्याती ।।४७।। पुढें कथा सुंदर । स्वामीसुताचें चरित्र । मन करोनिया स्थिर । सादर होउनी ऐकावें ।।४८।। इति श्रीस्वामीचरित्र सारामृत । नाना प्राकृत कथा संमत । सदा भाविक परिसोत । पंचदशोऽध्याय गोड हा ।।४९।।
श्रीस्वामीचरणार्पणमस्तु ।। श्रीरस्तु ।। शुभं भवतु ।।

# ।। षोडशोऽध्यायः ।।

श्रीगणेशाय नमः ।। भक्तजन तारणार्थ । यतिरूपें श्रीदत्त । भूवरीं प्रगट होत । अक्कलकोटीं वास केला ।।१।। जे जे झाले त्यांचे भक्त । त्यांत श्रेष्ठ स्वामीसुत । ऐकतां त्यांचे चरित्र । महादोष जातील ।।२।। प्रसिध्द मुंबई शहरांत । हरीभाऊ नामें विख्यात । आनंदें होते नांदत । निर्वाह करीत नोकरीनें ।।३।। कोंकणप्रांतीं राजापूर । तालुक्यांत, इटिया गांव सुंदर । हरीभाऊ तेथील रहाणार । जात मराठे तयांची ।।४।। ते खोत त्या गांवचे । होते संपन्न पूर्वीचे । त्याच गांवीं तयांचे । माता बंधु रहाती ।।५।। मुंबईत तयांचे मित्र । ब्राह्मण उपनांव पंडित । ते करितां व्यापार त्यांत । तोटा आला तयांसी ।।६।। एके समयीं पंडितांनी । स्वामीकीर्ति ऐकिली कानीं । तेव्हां भाव धरोनी मनीं । नवस केला स्वामीतें ।।७।। जरी आठ दिवसांत । मी होईन कर्जमुक्त । तरी दर्शना त्वरित । अक्कलकोटीं येईन ।।८।। यासी सात दिवस झाले । काही अनुभवा न आलें । तों नवल एक वर्तलें । ऐका चित्त

देउनी ।।९।। हरिभाऊ आणि त्यांचे मित्र । अफूचा व्यापार करितां त्यांत । आपणा नुकसान सत्य । येईल ऐसें वाटलें ।।१०।। त्यांनी काढिली एक युक्ती । बोलावुनी पंडितांप्रती । सर्व वर्तमान त्यां सांगती । म्हणती काय करावें ।।११।। हें नुकसान भरावयासी । द्रव्य नाहीं आम्हांपासीं । फिर्याद होतां अब्रूसी । बट्टा लागेल आमुच्या ।।१२।। तेव्हां पंडित बोलले । मलाही कांही कर्ज झालें । निघेल माझें दिवाळें । यांत संशय असेना ।।१३।। तुम्हीं व्हावया कर्जमुक्त । यासी करावी युक्ती एक । तुमचा होउनी मी मालक । लिहून देतों पेढीवरी ।।१४।। उभयतांसी तें मानलें । तत्काळ तयापरी केलें । तों नवल एक वर्तलें । ऐका सादर होवोनी ।।१५।। अफूचा भाव वाढला । व्यापारांत नफा जाहला । हें सांगावया पंडिताला । मारवाडी आला आनंदें ।।१६।। पंडितें ऐकोनि वर्तमान । आनंद झाला त्यालागोन । हरीभाऊतें भेटोन । वृत्त निवेदन मग केलें ।।१७।। अक्कलकोटीं स्वामी समर्थ । सांप्रतकाळीं वास करित । त्यांचीच कृपा ही सत्य । कर्जमुक्त झालों आम्हीं ।।१८।। नवस केला तयांसी । जाऊं आतां दर्शनासी ।

वार्ता ऐकुनी उभयतांसी । चमत्कार वाटला ।।१९।। ज्यांनीं आपुले मनोरथ । पूर्ण केले असती सत्य । ऐसे जे कां समर्थ । अक्कलकोटीं नांदती ।।२०।। तरी अक्कलकोटाप्रती । येतों तुमच्या सांगातीं । आम्हीं पाहुनियां स्वामीमूर्ती । जन्म सार्थक करूं कीं ।।२१।। गजानन हरिभाऊ पंडित । त्रिवर्ग अक्कलकोटीं जात । समर्थांचें दर्शन घेत । पूजन करीत भक्तीनें ।।२२।। पाहुनी समर्थांची मूर्ति । तल्लीन हरिभाऊची वृत्ती । मुख पाहतां नयनपातीं । न लवती तयांची ।।२३।। तेव्हां समर्थें तयांसी । शिव, राम, मारूती ऐसीं । नामें दिधलीं त्रिवर्गांसी । आणिक मंत्र दीधले ।।२४।। पंडिता राम म्हटलें । गजानना शिवनाम दिधलें । मारूती हरीभाऊस म्हटलें । तिघे केले एकरूप ।।२५।। मग समर्थें त्या वेळे । त्रिवर्गा जवळ बोलाविलें । तिघांसी तीन श्लोक दिधले । मंत्र म्हणोनी ते ऐका ।।२६।। श्लोक ।। गुरूर्ब्रह्मा गुरूर्विष्णुः गुरूर्देवो महेश्वरः ।। गुरूर्देव परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ।।१।। ऐसा मंत्र हरीभाऊतें । दिधला असे समर्थें । तेव्हां तयाच्या आनंदातें । पारावार नसेची ।।२७।। दुसरा मंत्र गजाननाला । तया वेळीं श्रींनीं दिधला ।

तेव्हा तयाच्या मनाला । आनंद झाला बहुसाळ ।।२८।। श्लोक ।। आकाशात् पतितं तोयं यथा गच्छति सागरम् ।। सर्व-देव-नमस्कारं केशवं प्रति गच्छति ।।२।। संतोषलें त्याचें मन । मग पंडितां जवळ घेवोन । एक मंत्र उपदेशोन । केलें पावन तयातें ।।२९।। श्लोक ।। इदमेव शिवं, इदमेव शिवम् । इदमेव शिवं, इदमेव शिवः ।।३।। तीनशें रूपये तयांनीं । आणिले होते मुंबईहुनी । त्यांचें काय करावें म्हणोनी । विचारिलें समर्थांतें ।।३०।। ऐसा प्रश्न ऐकोनी । समर्थ बोलले त्यालागोनी । त्यांच्या पादुका बनवोनी । येथें आणाव्या सत्वर ।।३१।। स्वामीसन्निध कांहीं दिन । त्रिवर्ग राहिले आनंदानें । हरिभाऊंचें तनमन । स्वामीचरणीं दृढ जडलें ।।३२।। कांही दिवस गेल्यावरी । त्रिवर्ग एके अवसरी । उभे राहूनी जोडल्या करीं । आज्ञा मागती जावया ।।३३।। आज्ञा मिळता तयांसी । आनंदें आलें मुंबईसी । हरीभाऊच्या मानसीं । ध्यास लागला स्वामींचा ।।३४।। व्यवहारीं वर्ततां । स्वस्थता नसेची चित्ता । गोड न लागती संसारवार्ता । चैन नसे क्षणभरी ।।३५।। असो पुढें त्रिवर्गांनीं । चांदीच्या पादुका

करवोनी । अर्पावया स्वामीचरणीं । आले अक्कलकोटातें ।।३६।। भक्तजनांचा कैवारी । पाहोनियां डोळेभरी । माथा ठेविला चरणावरी । बहुत अंतरीं सुखावले ।।३७।। चांदीच्या पादुका आणिल्या । त्या श्रीचरणीं अर्पण केल्या । समर्थे आदरें घेतल्या । पायीं घातल्या त्याच वेळीं ।।३८।। त्या आत्मलिंग पादुका । चौदा दिवसपर्यंत देखा । पायीं वागवी भक्तसखा । दिधल्या नाहीं कोणातें ।।३९।। हरीभाऊ एके दिनीं । समर्थांसन्निध येवोनी । दर्शन घेवोन श्रीचरणीं । मस्तक त्यांनी ठेविलें ।।४०।। तों समर्थें त्यांप्रती । घेवोनियां मांडीवरती । वरदहस्त सत्वरगती । मस्तकीं त्याचे ठेविला ।।४१।। म्हणती तूं माझा सुत । झालासी आतां निश्चित । परिधान करी भगवेंवस्त्र । संसार देई सोडोनी ।।४२।। मग छाटी कफनी झोळी । समर्थे तयांसी दिधली । ती घेवोनी तया वेळी । परिधान केली सत्वर ।।४३।। आत्मलिंग पादुका सत्वरी । देती हरीभाऊचे करीं । म्हणती जाउनी सागरतीरीं । किल्ला बांधोनी रहावें ।।४४।। धरूं नको आतां लाज । उभार माझा यशध्वज । नको करूं अन्य काज । जन भजना लावावे ।।४५।। जाऊनी आतां सत्वर ।

लुटवी आपुला संसार । लोभ मोह अणुमात्र । चित्ती तुवां न धरावा ।।४६।। आज्ञा ऐकोनियां ऐशी । आनंद झाला मानसीं । सत्वर आले मुंबईसी । साधुवेष घेवोनी ।।४७।। सद्गुरूनें मस्तकीं हस्त । ठेवितां झाले ज्ञानवंत । धन्य धन्य ते स्वामीसुत । धन्य स्वामी दयाळ ।।४८।। सद्गुरूचा उपदेश होतां । तत्काळ गेली भवव्यथा । उपरती झाली चित्ता । षड्विकार निमाले ।।४९।। बहुत गुरू जगीं असती । नाना मंत्र उपदेशिती । द्रव्यप्राप्तीस्तव निश्चितीं । ढोंग माजविती बहुत ।।५०।। तयांचा उपदेश न फळे । आत्मरूपीं मन न वळे । सत्यज्ञान कांही न कळे । मन न चळे प्रपंची ।।५१।। तयांसी न म्हणावे गुरू । ते केवळ पोटभरू । भवसागर पैलतिरू । उतरतील ते कैसे ।।५२।। तैसे नव्हेंची समर्थ । जे परमेश्वर साक्षात । मस्तकीं ठेवितां वरदहस्त । दिव्यज्ञान शिष्यांतें ।।५३।। असो हरीभाऊनें काय केलें । ब्राह्मणांसी बोलाविले । संकल्प करोनी ठेविलें । तुळसीपत्र घरावरी ।।५४।। हरीभाऊ घर लुटवितां । तारा नामें त्याची कांता । ती करी बहुत आकांता । घेत ऊर बडवोनी ।।५५।। म्हणे जोडोनिया कर । लुटवितां

तुम्हीं संसार । हा नव्हे बरवा विचार । दुःख लागेल भोगावें ।।५६।। आजवरी अब्रूनें । दिवस काढिले आपण । परी आतां अवलक्षण । आपणा काय आठवलें ।।५७।। हांसतील सकल जन । धिक्कारतील पिशुन । उपास पडतां कोण । खावयातें घालील ।।५८।। अल्पवयी आपणासी । बुध्दी सुचली हे कैसी । त्यागोनियां संसारसुखासी । दुःखडोहीं कां पडतां ।।५९।। संसारसुख भोगोन । पुढें येतां वृध्दपण । मग करावें मोक्षसाधन । सेवावे वन तपार्थ ।।६०।। आपल्या वडिलांची थोरवी । मनामाजी आणावी । त्यांची कीर्ति मळवावी । उचित नसे आपणा ।।६१।। तुम्हीं संसार सोडोनी । जाऊनी बसाल जरी वनीं । तरी मग सांगा कोणी । मजलागीं पोसावें ।।६२।। माझें करितां पाणिग्रहण । अग्नि ब्राह्मण साक्ष ठेवोन । आपण वाहिली असे आण । स्मरण करावें मानसीं ।।६३।। तुम्हीं म्हणाल मजसवें । तूंही घरदार सोडावें । मजसमागमें फिरावें । भिक्षा मागत घरोघरीं ।।६४।। तरी संसारसुखासक्त । मी असें जी सत्य सत्य । संसारीं मन विरक्त । माझें न होय कदाही ।।६५।। आतां जरी आपण । संसार टाकिला

लुटोन । हें केलें महत्पुण्य । ऐसें कोण म्हणेल ।।६६।। कुटुंबा उपवासी मारावें । सर्वस्व धर्म करावें । यासी काय पुण्यकार्य म्हणावें । पाप उलटें होतसे ।।६७।। विनवितें जोडोनी कर । अद्यापि स्वस्थ करा अंतर । आपला हा विचार । सोडोनी द्यावा प्राणप्रिया ।।६८।। ऐशीं तियेचीं उत्तरें । ऐकोनिया स्वामीकुमरें । समाधान बहुत प्रकारें । करीतसे तियेचें ।।६९।। परी तारेच्या चित्तांत । षड्रिपु होते जागत । संसाराचें मिथ्यत्व । तियेलागीं कळेना ।।७०।। आशा, मनीषा, भ्रांती आणि । कल्पना वासना या डाकिणी । त्यांनी तिजला झडपोनी । आपणाधीन केलेंसें ।।७१।। त्यायोगें सद्विचार । तियेसी न सुचे अणुमात्र । धरोनिया दुराग्रह । स्वामीसुता बोधीतसे ।।७२।। षड्विकार त्यागोनी । रतला जो स्वामीचरणीं । दृढ निश्चय केला मनीं । संसारत्याग करावा ।।७३।। स्त्रियेच्या अंगावरीं अलंकार । तेही लुटविले समग्र । तियें दिधलें शुभ्र वस्त्र । परिधान करावया ।।७४।। आत्मलिंग समर्थे । स्वामीसुतातें दिधलें होतें । त्या पादुका स्वहस्तें । मठामाजी स्थापिल्या ।।७५।। कामाठीपुऱ्यांत त्या समयीं । मठ स्थापिला असे पाहीं ।

हरीभाऊ होऊनी गोसावी । मठामाजी राहिले ।।७६।। धन्य धन्य ते स्वामीसुत । गुर्वाज्ञेनें झाले विरक्त । परी जन त्यांतें निंदित । नाना दोष देवोनी ।।७७।। पूर्वजन्मीं तप केलें । त्याचे फळ प्राप्त झालें । सद्‌गुरूचरणीं विनटले । सर्व फिटलें भवदुःख ।।७८।। धन्य धन्य स्वामी माउली । सुतावरी कृपा केली । त्यांच्या करूणेची साऊली । विष्णु शंकरावरी असो ।।७९।। इति श्रीस्वामीचरित्रसारामृत । नाना प्राकृत कथा संमत । सदा भाविक भक्त परिसोत । षोडशोऽध्याय गोड हा ।।८०।। श्रीरस्तु ।। शुभं भवतु ।।

# ।। सप्तदशोऽध्यायः ।।

श्रीगणेशाय नमः । मागील अध्यायीं कथा सुंदर । प्रख्यात जें मुंबई शहर । तेथें येऊनी स्वामीकुमर । मठ स्थापिती समर्थांचा ।।१।। षड्विकारा जिंकिलें । संसारातें त्यागिलें । रात्रंदिन रत झाले । स्वामीभजनीं सुखानें ।।२।। स्वात्मसुखीं तल्लीन वृत्ति । तेणें हरली संसृति । कवणाची नाहीं भीति । सदा चित्तीं आनंद ।।३।। स्वामीनामाचें भजन । त्यांचिया चरित्राचें कीर्तन । त्याहुनी व्यवसाय अन्य । स्वामीसुत नेणती ।।४।। संसारातें सोडोन । बैसले गोसावी होवोन । हें पाहुनी कित्येकजन । हासताती तयातें ।।५।। परी त्याचा विषाद चित्तीं । स्वामीसुत न मानिती । अंगीं बाणली पूर्ण विरक्ती । विषयासक्ती नसेचि ।।६।। स्वामीसुताची जननी । काकूबाई नामें करोनी । तिनें हें वृत्त ऐकोनी । दुःख केलें अनिवार ।।७।। मोहावर्ती सांपडले । मायावश जे झाले । त्यांसी प्रपंचा वेगळें । गोड कांही न लागेची ।।८।। पुत्रवात्सल्येंकरोन पाहीं । शोक करीत काकूबाई । मुंबईत लवलाही । सुताजवळीं पातल्या ।।९।। गोसावी निजसुता पाहोनी । वक्षःस्थळ

घेती बडवोनी । अंग टाकियलें धरणीं । बहुत आक्रोश मांडिला ।।१०।। निजमातेचा शोक पाहोन । दुःखित झालें अंतःकरण । तियेलागीं सांवरून । धरिलें सत्वर प्रेमानें ।।११।। तुझ्या उदरीं जन्मास आलों । सद्‌गुरुपायीं विनटलों । जन्ममरणातें चुकलों । मुक्त झालों सहजची ।।१२।। धन्य धन्य तूं गे जननी । मजलागीं प्रसवोनी । मान्य झालीस त्रिभुवनीं । काय धन्यता वर्णावी ।।१३।। अशा प्रकारें स्वामीसुत । मातेचें समाधान करित । मधुर शब्दें समजावीत । परमार्थ गोष्टी सांगोनी ।।१४।। परी त्याच्या या गोष्टी । तियेसी गोड न लागती । म्हणे याची भ्रष्ट मती । खचित असे जाहली ।।१५।। यासी पिशाच्चबाधा झाली । किंवा कोणी करणी केली । याची सोय पाहिजे पाहिली । पंचाक्षरी आणोनी ।।१६।। त्या समयीं प्रख्यात थोर । यशवंतराव भोसेकर । जयांसी देवमामलेदार । सर्व लोक बोलती ।।१७।। तयांची घेवोन भेटी । विचारावी कांही युक्ती । ते जरी कृपा करिती । तरी होय आरोग्य ।।१८।। ऐसा विचार करोनी पोटीं । दर्शना आल्या उठाउठीं । सांगितल्या सुताच्या गोष्टी । मुळापासोन सर्वही ।।१९।।

होवोनियां दीनवदन । करिती विनंती कर जोडोन । म्हणती सर्वज्ञ आपण । उपाय यासी सांगावा ।।२०।। ऐकोनियां देव मामलेदार । हांसोनि देती उत्तर । त्यासी पिशाच्च लागलें थोर । माझेनी दूर नोहेची ।।२१।। ऐसें उत्तर ऐकोनी । दुःखित झाली अंतःकरणीं । मग ते स्वामीसुताची जननी । अक्कलकोटीं येतसे ।।२२।। म्हणे ज्यानें वेड लाविलें । त्याचींच धरावीं पाऊलें । येणें उपायें आपुलें । कार्य सत्य होईल ।।२३।। असो इकडे स्वामीसुत । मुंबईमाजी वास्तव्य करित । हिंदु पारसी स्वामीभक्त । त्यांच्या उपदेशें जहाले ।।२४।। मठ होता कामाठीपुऱ्यांत । तेथें जागा नव्हती प्रशस्त । मग दिली कांदेवाडींत । जागा एका भक्तिणीनें ।।२५।। निस्सीम जे स्वामीभक्त । आनंदें भजनीं नाचत । कुटील जन त्यांतें हासत । ढोंग अवघें म्हणती हें ।।२६।। परी निंदा आणि स्तुती । दोन्ही समान जे मानिती । श्रीचरणांवीण आसक्ती । अन्य विषयावरी नसे ।।२७।। जन निंदा करिताती । अनेक प्रकारें दूषण देती । परी शांतचित्ते त्यांप्रती । उपदेशिती स्वामीसुत ।।२८।। जे अहंकारें बुडाले । सत्य पथाचरण चुकले । निज कार्यातें विसरले । मोहें पडले

भवजालीं ।।२९।। ऐसे जे कां मूढ जन । ते भक्तां देती दूषण । परी तेणें अंतःकरण । दुःखित नोहे तयांचें ।।३०।। तारा नामें त्यांची कांता । तेही त्रास देत स्वामीसुता । परी तयांच्या चित्ता । दुःख खेद नसेची ।।३१।। प्रथम मुंबई शहरांत । शके सत्राशें त्र्याण्णवांत । फाल्गुन कृष्ण त्रयोदशीस । स्वामीजयंती केलीसे ।।३२।। कोणे एके समयासी । नगरकर नाना जोशी । सहज आले मुंबईसी । त्यांनीं ऐकिलें वर्तमान ।।३३।। या नगरांत सांप्रत । स्वामीसुत स्वामीभक्त । गोसावी होऊनी रहात । महाज्ञानी असती ते ।।३४।। एकवार पहावें तयांसी । इच्छा झाली नानासी । मग कोणे एके समयासी । मठामाजी पातले ।।३५।। पाहुनी स्वामीसुताप्रती । आनंदले नाना चित्तीं । प्रेमानंदें चरण वंदिती । स्तवन करिती तयांचे ।।३६।। स्वामीसुतें तयासी । लावियलें स्वामीभक्तीसी । धन्य झाले नाना जोशी । रंगले भजनीं समर्थांच्या ।।३७।। ऐसे कित्येक सज्जन । स्वामीसुतें शिष्य करोन । वाढविलें महात्म्य पूर्ण । श्रीसमर्थ भक्तीचें ।।३८।। पुढें जोशीबुवांनीं । स्वामींची पत्रिका करोनी । ती अर्पावया

श्रीचरणीं । अक्कलकोटीं पातले ।।३९।। पत्रिका श्रीचरणीं अर्पिली । स्वामीमूर्ति आनंदली । समर्थें त्यासी आज्ञा केली । नगारा वाजवा म्हणोनी ।।४०।। नगारा वाजवितां जोशी । हासूं आलें समर्थांसी । पाहोनिया स्वभक्तासी । परमानंद जाहला ।।४१।। अक्कलकोटीं स्वामीसुत । श्रीसन्निध भजन करित । कीर्तनीं आनंदें नाचत । लोकलज्जा सोडोनी ।।४२।। लोकापवादाचें मानी भय । तो भक्ती करील काय । प्रेमानंद चित्ता नोहे । भजनीं मन लागेना ।।४३।। त्रिविध जन नानारीती । निंदा स्तुती करिताती । खेदानंद मानितां चित्तीं । चित्तवृत्ति द्विधा होय ।।४४।। असो अक्कलकोट नगरांत । शके सतराशें त्र्याण्णवांत । प्रथम स्वामीजयंती करित । स्वामीसुत आनंदें ।।४५।। छेली खेडें ग्रामांत । प्रथम स्वामी प्रगट होत । विजयसिंग नामें भक्त । गोट्या खेळत त्यांसवें ।।४६।। ऐसें स्वामीसुताचें मत । परी दिसे आधाररहित । सत्यासत्य जाणती समर्थ । आपण तेथें अज्ञानी ।।४७।। स्वामीसुत दिवसेंदिवस । स्वामीभक्ती करी विशेष । जन लाविले भजनास । कीर्तिध्वज उभारिला ।।४८।। मनामाजी धरूनी कामना ।

कोणी येतांची दर्शना । त्यांसी समर्थ करिती आज्ञा । सुताकडे जावयाची ।।४९।। स्वामीसुतही त्यांप्रती । मनांतील खूण सांगती । ऐकोनि जन चकित होती । वर्णिती ख्याति सुताची ।।५०।। एकदां सहज स्वामीसुत । अक्कलकोटीं दर्शना येत । तेव्हां समर्थ राजवाड्यांत । राहिले होते आनंदें ।।५१।। राणीचिये आज्ञेवांचोनी । दर्शन नोहे कोणालागोनी । ऐसें वर्तमान ऐकोनी । खिन्न मनीं स्वामीसुत ।।५२।। स्वामीदर्शन घेतल्याविण । तो न सेवी उदकान्न । ऐसे दिवस झाले तीन । निराहार राहिला ।।५३।। मग वाड्यासमोर जावोन । आरंभिलें प्रेमळ भजन । जें करूणरसें भरलें पूर्ण । ऐकिलें आंतून राणीनें ।।५४।। हा समर्थांचा निस्सीम भक्त । आनंदें भजनीं नाचत । समर्थदर्शनाची धरित । दृढ इच्छा अंतरीं ।।५५।। सेवकांसी म्हणें सत्वरी । तुम्ही जाऊनी या अवसरीं । त्या साधूतें मंदिरीं । प्रार्थोनियां आणावें ।।५६।। ऐसी राणीची आज्ञा होतां । सेवक धांवले तत्वतां । प्रार्थूनियां स्वामीसुता । मंदिरामाजी आणिले ।।५७।। पाहोनियां समर्थांसी । उल्हास सुताचे मानसीं । धावोनियां वेगेंसी । मिठी चरणीं घातली ।।५८।। सद्‌गदित अंतःकरणीं ।

चरण क्षाळिले नयनाश्रूंनीं । देहभान गेला विसरोनी । स्वामीपदीं सुखावला ।।५९।। बाळ चुकलें मातेसी । तें भेटलें बहुत दिवसीं । मग तयाच्या आनंदासी । पारावार नसेची ।।६०।। निजसुतातें पाहोनी । आनंदले समर्थ मनीं । कर फिरविला मुखावरूनी । हस्तीं धरूनी उठविलें ।।६१।। अक्कलकोटीं त्या अवसरीं । बहुत होते सेवेकरी । परी समर्थांची प्रीति खरी । स्वामीसुतावरी होती ।।६२।। त्यांत होते जे दुर्जन । ते सुताचा उत्कर्ष पाहोन । दूषित होय त्यांचे मन । द्वेष पूर्ण करिताती ।।६३।। कांहीं उपाय करोन । फिरवोन समर्थांचे मन । स्वामीसुतावरचें प्रेम । कमी करूं पाहताती ।।६४।। स्वामीसुत रात्रंदिन । समर्थांपुढे करिती भजन । पायीं खडावा घालोन । प्रेमरंगें नाचती ।।६५।। एके दिवशी श्रीसमर्थ । बैसले असतां आनंदांत । स्वामीसुत भजन करित । पायीं खडावा घालोन ।।६६।। ऐशी वेळ साधोनी । समर्थां सांगितलें दुर्जनीं । स्वामीसुताची हे करणी । योग्य नसे सर्वथा ।।६७।। बैसलां असतां आपण । पायीं खडावा घालोन । हा नाचतो काय म्हणून । आपुला अपमान करावया ।।६८।। परकी आणि निजसुत । समान

लेखिती जे सत्य । जे सर्वांसी अलिप्त । श्रेष्ठ कनिष्ठ कोण त्यांते ।।६९।। आतां खडावा काढोनी । मग नाचावें त्वां भजनीं । ऐशी आज्ञा सुतालागोनी । केली समर्थे त्या वेळीं ।।७०।। तोंच उठले कित्येकजण । खडावा घेतल्या काढोन । स्वामीसुताचा अपमान । केला ऐशा प्रकारें ।।७१।। पाहोनियां ऐशी परी । खिन्न झाला सुत अंतरीं । काळजांत बोंचली सुरी । अपमानदुःखे दुखावला ।।७२।। मरणाहुनी परम कठीण । दुःख देतसे अपमान । उतरलें सुताचें वदन । निस्तेज झाले सत्वर ।।७३।। तयाचे होते जे वैरी । ते आनंदले अंतरीं । म्हणती मोडली खोड बरी । अभिमान उतरला ।।७४।। असो मग स्वामीसुत । तें स्थळ सोडोनी त्वरित । नगराबाहेर येत । मार्ग धरित मुंबईचा ।।७५।। अपमानदुःखें दुखावला । अंतरीं बहू खिन्न झाला । परतोनी नाहीं आला । जन्मवरी अक्कलकोटीं ।।७६।। स्वाभिमानी जो नर । त्याचें दुखवितां अंतर । तें दुःख जन्मभर । त्याच्या मनीं जाचतसे ।।७७।। त्या दुःखें उत्तरोत्तर । क्षीण झाला स्वामीकुमर । दुःख करी दिवसरात्र । चैन नसे क्षणभरी ।।७८।। तोची रोग लागला । शेवटीं आजारी

पडला । ऐसा समाचार समजला । अक्कलकोटीं समर्थांते ।।७९।। स्वामीसुताची जननी । रहातसे त्या स्थानीं । तिनें हें वर्तमान ऐकोनी । विनवीत समर्थांतें ।।८०।। म्हणे कृपा करोनियां । सुतातें आणावें या ठायां । कृपादृष्टी पाहोनियां । आरोग्य तया करावें ।।८१।। मग समर्थे त्या अवसरीं । मुंबईस पाठविले सेवेकरी । म्हणती सुतातें सत्वरी । मजसन्निध आणावें ।।८२।। परी सुत त्या सांगातीं । आला नाहीं अक्कलकोटीं । अपमानदुःख त्याचे पोटीं । रात्रंदिन सलतसे ।।८३।। सेवेकरी परतोनी आले । समर्थांतें वृत्त कथिलें । आणखी दुसरे पाठविले । त्यांची गती तीच झाली ।।८४।। मग सांगती समर्थ । त्यासी घालोनि पेटींत । घेवोनि यावें त्वरित । कोणी तरी जावोनी ।।८५।। तथापि स्वामीसुत पाहीं । अक्कलकोटीं आला नाहीं । दिवसेंदिवस देही । क्षीण होत चालला ।।८६।। शेवटीं बोलले समर्थ । आतां जरी न ये सत्य । तरी तोफ भरूनी यथार्थ । ठेविली ती उडवूं कीं ।।८७।। याचा अर्थ स्पष्ट होता । तो समजला स्वामीसुता । परी तो न आला अक्कलकोटा । जीवितपर्वा न केली ।।८८।। आजार वाढला विशेष । श्रावणशुध्द प्रतिपदेस ।

केला असे कैलासवास । सर्व लोक हळहळती ।।८९।। त्या समयीं मुंबईत । तयाचे जे शिष्य होत । त्यांसीं झालें दुःख अमित । शोकसागरीं बुडाले ।।९०।। अक्कलकोटीं त्या दिनीं । समर्थ करिती विचित्र करणी । बैसले स्नान करोनी । परी गंध न लाविती ।।९१।। भोजनातें न उठती । धरणीवरी आंग टाकिती । कोणासंगें न बोलती । रुदन करिती क्षणोक्षणीं ।।९२।। इतुक्यामाजी सत्वर । मुंबईहुनी आली तार । श्रुत झाला समाचार । स्वामीसुत गत झाला ।।९३।। उदासीनता त्या दिवसीं । आली सर्व नगरासी । चैन न पडे काकूबाईंसी । पुसती समर्थां क्षणोक्षणी ।।९४।। मग काकूबाईने सत्वर । जवळ केलें मुंबापुर । तेथें समजला समाचार । परत्र पावला आत्मज ।।९५।। निजपुत्रमरणवार्ता । ऐकुनी करिती आकांता । तो दुःखद समय वर्णितां । दुःख अंतरीं होतसे ।।९६।। असो मग काकूबाई । अक्कलकोटीं लवलाहीं । परतोनि आल्या पाहीं । बोलल्या काय समर्थांते ।।९७।। सुत आपला भक्त असोन । अकालीं पावला कां मरण । मग स्मरती जे हे चरण । त्यांचे तारण होय कैसें ।।९८।। समर्थ बोलले तियेसी ।

उल्लंघिलें आमुच्या आज्ञेसी । संधी सांपडली काळासी । ओढुनी बळेंची मग नेला ।।९९।। पुत्रशोकें करोन । दुःख करी रात्रंदिन । समर्थ तियेचें समाधान । परोपरी करिताती ।।१००।। नरजन्मा येउनी सत्य । भक्ती केली एकनिष्ठ । केलें जन्माचें सार्थक । परमपदा पावले ।।१०१।। उंच नीच भगवंती । नसे कांहीं निश्चिती । ज्याची असेल जैसी भक्ती । श्रेष्ठ कनिष्ठ तेणेंची ।।१०२।। धन्य धन्य स्वामीकुमर । उतरला भवौदधि दुस्तर । ख्याति झाली सर्वत्र । कीर्ति अमर राहिली ।।१०३।। स्वामीसुताच्या गादीवरी । कोण नेमावा अधिकारी । ऐसा प्रश्न एके अवसरी । पुसती सेवेकरी समर्थांते ।।१०४।। ते कथा रसाळ अत्यंत । वर्णिली पुढील अध्यायांत । श्रोते होउनी सावधचित्त । अवधान द्यावें कथेसी ।।१०५।। जयजय श्रीभक्तपाला । जयजयाजी परम मंगला । विष्णु शंकराची विमला । कीर्ति पसरो सर्वत्र ।।१०६।। इति श्रीस्वामीचरित्रसारामृत । नाना प्राकृत कथा संमत । भाविक भक्त परिसोत । सप्तदशोऽध्याय गोड हा ।।१०७।। श्री भगवच्चरणार्पणमस्तु ।। श्रीरस्तु ।। शुभं भवतु ।।

# ।। अष्टदशोऽध्यायः ।।

श्रीगणेशाय नमः ।। स्वामीसुताच्या गादीवरी । कोण नेमावा अधिकारी । ऐसा प्रश्न सेवेकरी । करिताती समर्थांतें ।।१।। तेव्हां बोलले समर्थ । सेवेकरी असती सांप्रत । परी एकही मजला त्यांत । योग्य कोणी दिसेना ।।२।। जेव्हां येईल आमुच्या मानसीं । त्या समयीं मोर पांखरासी । अधिकारी नेमूं गादीसी । चिंता तुम्ही न करावी ।।३।। मोर पांखरा मोर पांखरा । समर्थ म्हणती वेळोवेळां । रात्रंदिन तोची चाळा । मोठमोठ्यांनें ओरडती ।।४।। आमुची पाऱ्याची वीट । जतन करावी नीट । वारंवार म्हणती समर्थ । काकूबाई लागोनी ।।५।। लपवुनी ठेविलें विटेसी । ती दिली पाहिजे आम्हांसी । याचा अर्थ कवणासी । स्पष्ट कांहीं कळेना ।।६।। असो स्वामीसुताचा भ्राता । कोंकणांत रहात होता । स्वामीसुत मृत्यू पावतां । वर्तमान कळलें त्या ।।७।। तो केवळ अज्ञान । दादा तयाचें अभिधान । त्याचे शरीरीं असमाधान । कृश होत चालला ।।८।। काकूबाईनें तयासी । आणविलें

आपणांपासीं । एके दिवशीं समर्थांसी । दादाप्रती दाखविलें ।।९।। बाळ चाललें वाळोनी । यासी अमृतदृष्टीनें पाहोनी । निरोगी करावें जी स्वामी । बाई विनवी समर्थांतें ।।१०।। समर्थ बोलले बाईसी । चार वेळां जेवूं घाल यासी । आरोग्य होईल बाळासी । चिंता मानसीं करूं नको ।।११।। त्याप्रमाणे बाई करितां । दादासी झाली आरोग्यता । समर्थांची कृपा होतां । रोग कोठे राहील ।।१२।। केजगांव मोंगलाईंत । तेथें नानासाहेब भक्त । त्यांनी बांधिला श्रींचा मठ । द्रव्य बहुत खर्चिले ।।१३।। श्रींची आज्ञा घेउनी सत्य । पादुका स्थापाव्या मठांत । याकारणें अक्कलकोटीं येत । दर्शन घेत समर्थांचें ।।१४।। ते म्हणती काकूबाईसी । पादुका स्थापन करायासी । तुम्ही पाठवा दादासी । समागमें आमुच्या ।।१५।। बाई म्हणें तो अज्ञान । तशांत शरीरीं असमाधान । त्याची काळजी घेईल कोण । सत्य सांगा मजलागीं ।।१६।। परी आज्ञा देतील समर्थ । तरी पाठवीन मी सत्य । मग समर्थांजवळी येत । घेवोनियां दादासी ।।१७।। समर्थे वृत्त ऐकोन । म्हणती द्यावें पाठवून । बाळ जरी आहे अज्ञ । तरी सांभाळू तयासी ।।१८।। काकूबाई बहुत

प्रकारें । समर्थां सांगे मधुरोत्तरें । दादासी पाठविणें नाही बरें । वर्जावें आपण सर्वांतें ।।१९।। समर्थ तियेसी बोलले । त्यांत तुमचें काय गेलें । आम्हांसी दिसेल जें भलें । तेंच आम्हीं करूं कीं ।।२०।। शेवटीं मंडळीसांगातीं । दादासी पाठविलें केजेप्रती । पादुका स्थापन झाल्यावरती । दादा आला परतोनी ।।२१।। पुढें सेवेकऱ्यांसांगातीं । त्यासी मुंबईस पाठविती । ब्रह्मचाऱ्यांसी आज्ञा करिती । यासी स्थापा गादीवरी ।।२२।। ब्रह्मचारीबुवांजवळी । दादासी नेत मंडळी । जी समर्थे आज्ञा केली । ती सांगितली तत्काळ ।।२३।। दादासी करूनी गोसावी । मुंबईची गादी चालवावी । स्वामीसुताची यास द्यावी । कफनी झोळी निशाण ।।२४।। ब्रह्मचारी दादासी । उपदेशिती दिवस निशीं । गोसावी होउनी गादीसी । चालवावें आपण ।।२५।। दादा जरी अज्ञान होता । तरी ऐशा गोष्टी करितां । नकार म्हणेची सर्वथा । न रूचे चित्ता त्याचिया ।।२६।। यापरी ब्रह्मचाऱ्यांनी । पाहिली खटपट करोनी । शेवटी दादासी मुंबईहुनी । अक्कलकोटा पाठविलें ।।२७।। दादास घेउनी सत्वरी । श्रीसन्निध आले टाळकरी । तेव्हां दादा घेवोनी तुंबरी । भजन करीत

आनंदे ।।२८।। समर्थें ऐशा समयासी । आज्ञा केली भुजंगासी । घेउनी माझ्या पादुकांसी । मस्तकीं ठेव दादाच्या ।।२९।। मोर्चेल आणुनी सत्वरी । धरा म्हणती त्यावरी । आज्ञेप्रमाणें सेवेकरी । करिताती तैसेंच ।।३०।। श्रींच्या पादुका शिरीं पडतां । उपरती झाली त्याच्या चित्ता । हृदयीं प्रगटली ज्ञानसविता । अज्ञान गेलें लयातें ।।३१।। दादा भजनीं रंगला । देहभानही विसरला । स्वस्वरूपीं लीन झाला । सर्व पळाला अहंभाव ।।३२।। धन्य गुरूचें महिमान । पादुका स्पर्शेंकरोन । जहालें तात्काळ ब्रह्मज्ञान । काय धन्यता वर्णावी ।।३३।। असो दादाची पाहुनी वृत्ती । काकूबाई दचकली चित्तीं । म्हणे समर्थें दादाप्रती । वेड खचित लाविलें ।।३४।। ती म्हणे जी समर्था । आपण हें काय करितां । दादाचिया शिरीं ठेवितां । पादुका काय म्हणोनी ।।३५।। समर्थ बोलले तियेसी । जें बरें वाटेल आम्हांसी । तेंची करूं या समयासी । व्यर्थ बडबड करूं नको ।।३६।। काकूबाई बोले वचन । एकासी गोसावी बनवोन । टाकिला आपण मारून । इतुकेंची पुरें झालें ।।३७।। ऐकोन ऐशा वचनाला । समर्थांसी क्रोध आला । घाला म्हणती

बाईला । खोड्यामाजीं सत्वर ।।३८।। काकूबाईनें आकांत । करूनी मांडिला अनर्थ । नाना अपशब्द बोलत । भाळ पिटीत स्वहस्तें ।।३९।। परी समर्थे त्या समयीं । लक्ष तिकडे दिलें नाही । दादासी बनविलें गोसावी । कफनी झोळी अर्पिली ।।४०।। दुसरे दिवशीं दादासी । समर्थ पाठविती भिक्षेसी । तें पाहुनी काकूबाईसी । दुःख झाले अपार ।।४१।। लोळे समर्थांच्या चरणावरी । करूणा भाकी पदर पसरी । विनवीतसे नानापरी । शोक करी अपार ।।४२।। समर्थांसी हांसू आलें । अधिकचि कौतुक मांडिलें । दादासी जवळ बोलाविलें । काय सांगितलें तयासी ।।४३।। अनसुया तुझी माता । तिजपाशीं भिक्षा माग आतां । अवश्य म्हणोनी तत्वतां । जननीजवळी पातला ।।४४।। ऐसें बाईनें पाहोनी । क्रोधाविष्ट अंतःकरणीं । म्हणे तुझी हे करणी । लोकापवादाकारण ।।४५।। भिक्षान्न आपण सेवावें । हें नव्हेची जाण बरवें । चाळे अवघे सोडावे । संसारी व्हावें सुखानें ।।४६।। ऐकोनी मातेची उक्ती । दादा तिजप्रती बोलती । ऐहिक सुखें तुच्छ गमती । मातें आजपासोनी ।।४७।। पुत्राचें ऐकोन वचन । उदास झाले तिचें मन । असो दादा

गोसावी होवोन । स्वामीभजनीं रंगले ।।४८।। कांही दिवस झाल्यावरी । मग आले मुंबापुरी । स्वामीसुताच्या गादीवरी । बसोनी संस्था चालविली ।।४९।। ते दादाबुवा सांप्रती । मुंबईमाजी वास्तव्य करिती । काकूबाई अक्कलकोटीं । वसताती आनंदे ।।५०।। कलियुगीं दिवसेंदिवस । वाढेल स्वामीमहिमा विशेष । ऐसें बोलले स्वामीदास । येथें विश्वास धरावा ।।५१।। दोघां बंधूंचें ऐसें वृत्त । वर्णिलें असे संकलित । केला नाहीं विस्तार येथ । सार मात्र घेतलें ।।५२।। जैसे श्रेष्ठ स्वामीसुत । तैसेची दादाबुवा सत्य । भूवरी जगदोध्दारार्थ । विष्णु शंकर अवतरले ।।५३।। इति श्रीस्वामीचरित्रसारामृत । नाना प्राकृत कथा संमत । सदा प्रेमळ परिसोत । अष्टदशोऽध्याय गोड हा ।।५४।। श्रीरस्तु ।। शुभं भवतु ।।

# ।। एकोणविंशोऽध्याय: ।।

श्रीगणेशाय नमः ।। एकाग्रचित्तें करितां श्रवण । तेणें होय दिव्य ज्ञान । त्या ज्ञानें परमार्थसाधन । पंथ सुलभ होतसे ।।१।। सच्चरित्रें श्रवण करितां । पदमानंद होय चित्ता । ओळखूं ये सत्यासत्यता । परमार्थ प्रपंचाची ।।२।। या नरदेहा येवोन । काय करावें आपण । जेणें होईल सुगम । दुस्तर हा भवपंथ ।।३।। ज्यासी वानिती भले । सज्जन ज्या मार्गें गेले । सर्व दुःखमुक्त झाले । तो पंथ धरावा ।।४।। बोलणें असों हें आतां । वर्णू पुढें स्वामीचरिता । अत्यादरें श्रवण करितां । सर्वार्थ पाविजे निश्चयें ।।५।। प्रसिध्द आळंदी क्षेत्रीं । नामें नृसिंहसरस्वती । जयाची सर्वत्र ख्याती । अजरामर राहिली ।।६।। कृष्णातटाकीं क्षेत्रें पवित्र । तीं देखिलीं त्यांनीं समस्त । नाना योगाभ्यासी बहुत । महासाधु देखिले ।।७।। करावें हठयोगसाधन । ऐसी इच्छा बहुत दिन । नाना स्थानें फिरोन । शोध करिती गुरूचा ।।८।। जपी तपी संन्यासी । देखिले अनेक तापसी । जे सदा अरण्यवासी । योगाभ्यासी

बैसले ।।९।। एक सूर्यमंडळ विलोकिती । एक पंचाग्नी साधन करिती । एक वायु भक्षिताती । मौन धरिती कितीएक ।।१०।। एक झाले दिगंबर । एकीं केला ऊर्ध्व कर । एक घालिती नमस्कार । एक ध्यानस्थ बैसले ।।११।। एक आश्रमीं राहोन । शिष्यां सांगती गुह्यज्ञान । एक करिती तीर्थाटन । एक पूजनीं बैसले ।।१२।। ऐसे असंख्य देखिले । ज्ञान तयांचें पाहिलें । कित्येकांचे चरण धरिले । परी गेलें व्यर्थची ।।१३।। हठयोग परम कठीण । कैसा करावा साध्य आपण । याविषयीं पूर्ण ज्ञान । कोणी तयातें सांगेना ।।१४।। एके समयीं अक्कलकोटीं । स्वामी दर्शनेच्छा धरूनी पोटी । आले नृसिंहसरस्वती । महिमा श्रींचा ऐकोनी ।।१५।। नृसिंहसरस्वती दर्शनासी । येती कळलें समर्थांसी । जाणिलें त्यांच्या हृद्गतासी । अंतरामाजीं आधींच ।।१६।। सन्मुख पाहोनी तयांला । आज्ञाचक्रभेदांतला । एक श्लोक सत्वर म्हटला । श्रवणीं पडला तयांच्या ।।१७।। श्लोक ऐकतां तेथेंची । समाधी लागली साची । स्मृति न राहिली देहाची । ब्रह्मरंध्रीं प्राणवायु ।।१८।। आश्चर्य करिती सकळ । असो झालिया कांहीं वेळ । समाधी उतरोनी तत्काळ ।

नृसिंहसरस्वती धांवले ।।१९।। स्वामी पदांबुजांवरी । मस्तक ठेविलें झडकरी । सद्‌गदित झाले अंतरी । हर्ष पोटीं न समावे ।।२०।। उठोनियां करिती स्तुती । धन्य धन्य हे यतिमूर्ती । केवळ परमेश्वर असती । रूप घेती मानवाचें ।।२१।। मीं आज कित्येक दिवस । हठयोगसाधन करायास । केले बहुत सायास । परी सर्व व्यर्थ गेले ।।२२।। स्वामीकृपा आज झाली । तेणें माझी इच्छा पुरली । चिंता सकल दूर झाली । कार्यभाग साधला ।।२३।। असो नृसिंहसरस्वती । आळंदी क्षेत्रीं परतोन येती । तेथेंची वास्तव्य करिती । सिध्दि प्रसन्न जयांला ।।२४।। बहुत धर्मकृत्यें केली । दूरदूर किर्ती गेली । कांही दिवशीं एकेवेळीं । अक्कलकोटीं पातले ।।२५।। घेतलें समर्थांचें दर्शन । उभे राहिले कर जोडोन । झालें बहुत समाधान । गुरूमूर्ति पाहोनिया ।।२६।। पाहोनी नृसिंहसरस्वतीसी । समर्थ बोलले त्या समयासी । लोकीं धन्यता पावलासी । वारयोषिता पाळोनी ।।२७।। तियेसी द्यांवे सोडोनी । तरीच श्रेष्ठत्व पावसी जनीं । मग सहजची सुरभुवनीं । अंती जासी सुखानें ।।२८।। ऐकोनी समर्थांची वाणी । आश्चर्य वाटलें सकलां मनीं ।

नृसिंहसरस्वती स्वामी असोनी । विपरीत केवीं करितील ।।२९।। परी अंतरींची खूण । यति तत्काळ जाणोन । पाहों लागले अधोवदन । शब्द एक न बोलवे ।।३०।। सिध्दी करोनी प्रसन्न । वाढविलें आपुलें महिमान । तेची वारयोषितेसमान । अर्थ स्वामीवचनाचा ।।३१।। असो तेव्हांपासोनी । सिध्दी दिधली सोडोनी । येवोनी राहिले स्वस्थानीं । धर्मकृत्यें बहु केलीं ।।३२।। यशवंतराव भोसेकर । नामें देवमामलेदार । त्यांसीही ज्ञान साचार । समर्थकृपेनें जहालें ।।३३।। ऐसे सच्छिष्य अनेक । श्री कृपेनें ज्ञानी विशेष । ज्यांनी ओळखिलें आत्मरूप । महिमा त्यांचा न वर्णवे ।।३४।। वासुदेव फडके ब्राह्मण थोर । ज्याची प्रसिध्दी सर्वत्र । इंग्रजी अमलांत अनिवार । होऊनी बंड केलें ज्यानें ।।३५।। समर्थांची कृपा होतां । इच्छित कार्य साधेल तत्वतां । ऐसें वाटलें त्याचे चित्ता । दर्शनातें पातला ।।३६।। करीं नग्न तलवार । घेवोन आला श्रींसमोर । घालोन साष्टांग नमस्कार । मनामाजीं प्रार्थीत ।।३७।। स्वकार्य चिंतोनी अंतरीं । खड्ग दिधलें श्रींच्या करीं । म्हणे मजवरी कृपा जरी । तरी खड्ग हातीं देतील ।।३८।।

जावोनी बैसला दूर । श्रीनीं जाणिलें अंतर । त्याचें पाहोनि कर्म घोर । राजद्रोह मानसीं ।।३९।। लगबगें उठली स्वारी । सत्वर आली बाहेरी । तरवडाचे झाडावरी । तलवार दिली टाकोनी ।।४०।। वासुदेवराव पाहोनी । खिन्न झाला अंतःकरणीं । समर्थांतें आपुली करणी । नावडे सर्वथा म्हणतसे ।।४१।। कार्य आपण योजिलें । तें शेवटा न जाय भलें । ऐसे समर्थे दर्शविले । म्हणुनी न दिलें खड्ग करीं ।।४२।। परी तो अभिमानी पुरुष । खड्ग घेवोनि तैसेंच । आला परत स्वस्थानास । झेंडा उभारिला बंडाचा ।।४३।। त्यांत त्यासी यश न आलें । सर्व हेतु निष्फळ झाले । शेवटीं पारिपत्य भोगले । कष्ट गेले व्यर्थचि ।।४४।। असो स्वामींचे भक्त । तात्या भोसले विख्यात । राहती अक्कलकोटांत । राजाश्रित सरदार ।।४५।। कांहीं कारण जहालें । संसारीं मन विटलें । मग प्रपंचातें सोडिलें । भक्त झाले स्वामींचे ।।४६।। मायापाश तोडोनी । दृढ झाले स्वामीचरणीं । भजन पूजन निशिदिनीं । करिताती आनंदे ।।४७।। अकस्मात एके दिवशीं । भयभीत झाले मानसीं । यमदूत दिसती दृष्टीसी । मृत्युसमय पातला ।।४८।। पाहोनियां विपरीत परी । श्रीचरण धरिले

झडकरी । उभा राहिला काळ दूरी । नवलपरी जहाली ।।४९।। दीन वदन होवोनी । दृढ घातली मिठी चरणीं । तात्या करिती विनवणी । मरण माझें चुकवावे ।।५०।। तें पाहोनी श्रीसमर्थ । कृतान्तासी काय सांगत । हा असे माझा भक्त । आयुष्य याचें न सरलें ।।५१।। पैल तो वृषभ दिसत । त्याचा आज असे अंत । त्यासी न्यावें त्वां त्वरित । स्पर्श यातें करूं नको ।।५२।। ऐसें समर्थ बोलले । तोंची नवल वर्तलें । तात्काळ वृषभाचे प्राण गेले । धरणीं पडलें कलेवर ।।५३।। जन पाहोनी आश्चर्य करिती । धन्यता थोर वर्णिताती । बैलाप्रति दिधली मुक्ती । मरण चुकलें तात्यांचें ।।५४।। ऐशा लीला असंख्य । वर्णूं जाता वाढेल ग्रंथ । हें स्वामीचरित्रसारामृत । चरित्रसारमात्र येथें ।।५५।। जयाची लीला अगम्य । ध्याती ज्यातें निगमागम । सुर-नर वर्णिताती गुण । अनादिसिध्द परमात्मा ।।५६।। नानारूपें नटोनी । स्वेच्छें विचरे जो या जनीं । भक्तां सन्मार्ग दाखवोनी । भवसागरीं तारित ।।५७।। त्या परमात्म्याचा अवतार । श्रीस्वामी यति दिगंबर । प्रगट झाले धरणीवर । जगदुध्दाराकारणें ।।५८।। त्यांची पदसेवा निशिदिनीं । करोनी तत्पर

सदा भजनीं । विष्णु शंकराचे मनीं । हेंची वसो सदैव ।।५९।। इति श्रीस्वामीचरित्रसारामृत । नाना प्राकृत कथा संमत । सदा परिसोत प्रेमळ भक्त । एकोणविंशोऽध्याय गोड हा ।।६०।। श्रीरस्तु ।। शुभं भवतु ।।

# ।। विंशोऽध्यायः ।।

श्रीगणेशाय नमः ।। जयजयाजी करूणाकरा । जयजयाजी यतिवरा । भक्तजन संतापहरा । सर्वेश्वरा गुरूराया ।।१।। लीलावेषधारी दत्ता । सर्वसाक्षी अनंता । विमलरूपा गुरूनाथा । परब्रह्म सनातना ।।२।। तुझें चरित्र अगाध । केवीं वर्णूं मी मतिमंद । परी घेतला असे छंद । पूर्ण केला पाहिजे ।।३।। तुझ्या गुणांचें वर्णन । करितां भागे सहस्त्रवदन । निगमागमांसही जाण । नसे पार लागला ।।४।। तुझें वर्णावया चरित्र । तुजसम कवी पाहिजेत । तरी अल्पमतीनें अत्यल्प । गुणानुवाद कां न गावे ।।५।। वर्णितां समर्थांचे गुण । नाना दोष होती दहन । सांगतां ऐकतां पावन । वक्ता श्रोता दोघेही ।।६।। अक्कलकोटीं वास केला । जनां दाविल्या अनंत लीला । उध्दरिलें कैक पाप्यांला । अद्‌भुत चरित्र स्वामींचें ।।७।। असो कोणे एके दिवशीं । इच्छा धरोनी मानसीं । गृहस्थ एक दर्शनासी । समर्थांच्या पातला ।।८।। करोनियां श्रींची स्तुती । माथा ठेविला चरणांवरती । तेव्हां समर्थ

त्यातें वदती । हास्यवदनें करोनी ।।९।। फकिरातें देई खाना । तेणें पुरतील सर्व कामना । पक्वान्नें करोनी नाना । यथेच्छ भोजन देईजे ।।१०।। गृहस्थें आज्ञा म्हणोन । केलीं नाना पक्वान्ने । फकीर बोलाविले पांचजण । जेवूं घातलें तयांतें ।।११।। फकीर तृप्त होवोनी जाती । उच्छिष्ट उरलें पात्रावरतीं । तेव्हां समर्थ आज्ञापिती । गृहस्थातें सत्वर ।।१२।। शेष अन्न करी ग्रहण । तुझे मनोरथ होतील पूर्ण । परी त्या गृहस्थाचें मन । साशंक झालें तेधवां ।।१३।। म्हणे यवन याती अपवित्र । त्यांचें कैसें घेऊं उच्छिष्ट । यातीमध्यें पावेन कष्ट । कळतां स्वजना गोष्ट हे ।।१४।। आला मनीं ऐसा विचार । तो समर्थांस कळला सत्वर । म्हणती हा अभाविक नर । कल्पना चित्तीं याचिया ।।१५।। इतक्यामाजीं साहजिक । कोणी भ्रमिष्ट गृहस्थ एक । येवोन स्वामीसन्मुख । स्वस्थ उभा राहिला ।।१६।। दारिद्रयें ग्रस्त झाला म्हणोन । भ्रमिष्ट फिरे रात्रंदिन । द्रव्य मेळवाया साधन । त्याजवळी नसे परी ।।१७।। त्यासी देखोन समर्थ । म्हणती हें उच्छिष्ट घे त्वरित । तो निःशंक मनांत । पात्रावरी बैसला ।।१८।। त्यासी बोलले समर्थ । तूं मुंबापुरी

जाई त्वरित । सफल होतील मनोरथ । द्रव्यप्राप्ती होईल ।।१९।। स्वामीवचनीं भाव धरिला । तत्काळ मुंबईस आला । उगाच भटकों लागला । द्रव्य मिळेल म्हणोनी ।।२०।। प्रभात समयीं एके दिवशीं । गृहस्थ निघाला फिरायासी । येऊन एका घरापासी । स्वस्थ उभा राहिला ।।२१।। तों घरांतून एक वृध्द बाई । दार उघडोन घाई घाई । बाहेर येवोनिया पाही । गृहस्थ पडला दृष्टीसी ।।२२।। तिनें बोलाविलें त्याला । आसनावरी बैसविला । दहा हजारांच्या दिधल्या । नोटा आणून सत्वर ।।२३।। गृहस्थ मनीं आनंदला । बाईतें आशीर्वाद दिधला । द्रव्यलाभ होतां आला । शुध्दीवरी सत्वर ।।२४।। समर्थांचें वचन सत्य । गृहस्था आली प्रचीत । वारंवार स्तुती करित । स्तोत्र गात स्वामींचे ।।२५।। समर्थांची लीला विचित्र । केवीं वदूं शके मी पामर । ज्या वर्णितां थोर थोर । श्रमित झाले कविराज ।।२६।। कोणी दाता नृपवर । दान कराया भांडार । मोकळें करी परी शक्त्यनुसार । याचक नेती बांधोनी ।।२७।। षड्स अन्नाचे ढीग पडले । क्षुधित जन तेथें आले । त्यांनी त्यांतून भक्षिलें । क्षुधा शांत होईतों ।।२८।। स्वामीचरित्र

भांडारांतून । रत्ने घेतलीं निवडोन । प्रेमादरें माळ करोन । श्रोतयांचे कंठी घातली ।।२९।। श्रीस्वामीचरणसरोजीं । विष्णुभ्रमर घाली रुंजी । अत्यादरें चरण पूजी । शंकर स्तोत्र गातसे ।।३०।। इति श्रीस्वामीचरित्रसारामृत । नाना प्राकृत कथा संमत । सदा ऐकोत भाविक भक्त । विंशोऽध्याय गोड हा ।।३१।।
श्रीरस्तु ।।शुभं भवतु ।।

# ।। एकविंशोऽध्यायः ।।

श्रीगणेशाय नमः ।। निर्मिलीं सुंदर देवमंदिरें । चौक बैठका नानाप्रकारें । कळस ठेवल्यावरी सारें । पूर्ण झालें म्हणती त्या ।।१।। स्वामीचरित्रसारामृत । झालें वीस अध्याय पर्यंत । करोनी माझें मुख निमित्त । वदले श्रीस्वामीराज ।।२।। आतां कळसाध्याय एकविसावा । कृपा करोनी वदवावा । हा ग्रंथ संपूर्ण करावा । भक्तजनांकारणें ।।३।। संपवावा अवतार आतां । ऐसें मनामाजीं येतां । जडदेह त्यागोनि तत्वतां । गेले स्वस्थानीं यतिराज ।।४।। शके अठराशें पूर्ण । संवत्सर तो बहुधान्य । मास चैत्र पक्ष कृष्ण । त्रयोदशी मंगळवार ।।५।। दिवस गेला तीन प्रहर । चतुर्थ प्रहराचा अवसर । चित्त करोनी एकाग्र । निमग्न झाले निजरूपीं ।।६।। षट्चक्रातें भेदोन । ब्रह्मरंध्रा छेदून । आत्मज्योत निघाली पूर्ण । हृदयामधुनीं तेधवां ।।७।। जवळ होते सेवेकरी । त्यांच्या दुःख झालें अंतरीं । शोक करिती नानापरी । तो वर्णिला न जाय ।।८।। अक्कलकोटींचे जन समस्त । दुःखें करून

आक्रंदत । तो वृत्तान्त वर्णिता ग्रंथ । वाढेल समुद्रसा ।।९।। असो स्वामींच्या अनंत लीला । जना सन्मार्ग दाविला । उध्दरिलें जडमूढांला । तो महिमा कोण वर्णी ।।१०।। कोंकणांत समुद्रतीरीं । प्रसिध्द जिल्हा रत्नागिरी । पालशेत ग्रामामाझारीं । जन्म माझा झालासे ।।११।। श्रेष्ठ चित्तपावन ज्ञातींत । उपनाम असे थोरात । बळवंत पार्वतीसुत । नाम माझें विष्णु असे ।।१२।। तेथेंची बाळपण गेलें । आतां कोपरलीस येणें केले । उपशिक्षक पद मिळालें । विद्यालयी सांप्रत ।।१३।। वाणी मारवाडी श्रेष्ठ । नाम ज्यांचे शंकरशेट । त्यांसी स्नेह झाला निकट । आश्रयदाते ते माझे ।।१४।। त्यांची स्वामीचरणीं भक्ती । भावार्थे पूजन करिती । धिंवसा उपजली चित्तीं । स्वामीचरित्र श्रवणाची ।।१५।। तें मजला सांगितलें । मी स्वामीगुणानुवाद गाईले । हें स्वामीचरित्र लिहिलें । अल्प मतीनें अत्यल्प ।।१६।। शब्द सोपे व्यावहारिक भाषा । प्रत्येक अध्याय लहानसा । आबालवृध्दां समजे असा । लघु ग्रंथ रचिला हा ।।१७।। प्रथमाध्यायीं मंगलाचरण । कार्यसिध्द्यर्थ देवतास्तवन । आधार स्वामीचरित्रास कोण । हेंची

कथन केलेसे ।।१८।। श्रीगुरू कर्दळीवनांतुनी आले । स्वामीरूपें प्रगटले । भूवरी प्रख्यात झाले । हें कथन द्वितीयाध्यायीं ।।१९।। तारावया भक्तजनांला । अक्कलकोटीं प्रवेश केला । तेथींचा महिमा वर्णिला । तृतीयाध्यायीं निश्चयें ।।२०।। स्वामींचा करावया छळ । आले दोन संन्यासी खल । तेंचि वृत्त सकल । चवथ्यामाजीं वर्णिले ।।२१।। मल्हारराव राजा बडोद्यासी । त्यानें न्यावया स्वामींसी । पाठविलें कारभाऱ्यांसी । पांचव्यांत ते कथा ।।२२।। यशवंतराव सरदार । त्यासी दाविला चमत्कार । तयाचें वृत्त समग्र । सहाव्यांत वर्णिलें ।।२३।। विष्णुबुवा ब्रह्मचारी । त्यांची स्वामीचरणांवरी । भक्ती जडली कोणे प्रकारीं । तें सातव्यात सांगितले ।।२४।। शंकर नामें एक गृहस्थ । होता ब्रह्मसमंधें ग्रस्त । त्यासी केले दुःखमुक्त । आठव्यांत ते कथा ।।२५।। खर्चोनिया द्रव्य बहुत । त्यांनी बांधिला सुंदर मठ । तें वर्णन समस्त । नवव्यांत केलेंसे ।।२६।। चिदंबर दीक्षिताचें वृत्त । वर्णिलें दशमाध्यायांत । तें ऐकतां पुनीत । श्रोते होती सत्यची ।।२७।। अकरावा आणि बारावा । तैसाची अध्याय तेरावा । बाळाप्पाचा इतिहास बरवा । त्यामाजी

निरूपिला ।।२८।। भक्तिमार्ग निरूपण । संकलित केलें वर्णन । तो चवदावा अध्याय पूर्ण । सत्तारक भाविका ।।२९।। बसाप्पा तेली सद्भक्त । तो कैसा झाला भाग्यवंत । त्याची कथा गोड बहुत । पंधराव्यात वर्णिली ।।३०।। हरिभाऊ मराठे गृहस्थ । कैसे झाले स्वामीभक्त । सोळा सतरा यांत निश्चित । वृत्त त्यांचे वर्णिले ।।३१।। स्वामीसुताचा कनिष्ठ बंधु । त्यासी लागला भजनछंदू । जो दादाबुवा प्रसिध्दु । अठराव्यांत वृत्त त्यांचें ।।३२।। वासुदेव फडक्याची गोष्ट। आणि तात्याचें वृत्त । वर्णिलें एकूणविसाव्यांत । सारांशरूपें सत्य पै ।।३३।। एक गृहस्थ निर्धन । त्यासी आले भाग्य पूर्ण । तेंचि केले वर्णन । विसाव्यांत निर्धारें ।।३४।। स्वामी समाधिस्थ झाले । एकविसाव्यांत वर्णिले । ग्रंथप्रयोजन कविवृत्त निवेदिलें । पूर्ण केलें स्वामीचरित्र ।।३५।। शके अठराशें एकुणवीस । वसंतऋतु चैत्र मास । गुरूवार वद्य त्रयोदशीस । पूर्ण केला ग्रंथ हा ।।३६।। बळवंत नामें माझा पिता । पार्वती माता पतिव्रता । वंदोनी त्यां उभयतां । ग्रंथ समाप्त केलासे ।।३७।। स्वामींनी दिधला या वर । जो भावें वाचील हें चरित्र । त्यासी

आयुरारोग्य अपार । संपत्ती संतती प्राप्त होय ।।३८।। त्याची वाढो विमल कीर्ति । मुखी वसो सरस्वती । भवसागर तरोन अंतीं । मोक्षपद मिळो त्यां ।।३९।। आंगी सर्वदा विनय वसो । वृथाभिमान तो नसो । सर्व विद्यासार गवसो । भक्तश्रेष्ठालागूनी ।।४०।। ज्यां कारणें ग्रंथ रचिला । जिहीं प्रसिध्दीस आणिला । त्यांसी रक्षावें दयाळा । कृपाघना समर्था ।।४१।। मी केवळ मतिमंद । परी भावें घेतला छंद । कृपाळू तूं सच्चिदानंद । पूर्ण केला दयाळुवा ।।४२।। दोन्ही कर जोडोनी । आतां हेची विनवणी । ग्रंथसंरक्षकांलागोनी । सुखी ठेवी दयाळा ।।४३।। आतां ज्ञानी वाचक असती । त्यांस करूं एक विनंती । मी केवळ हीनमती । कवित्व करूं नेणेची ।।४४।। परी माझीं हीं आर्ष उत्तरें । वाचावी ऐकावीं आदरें । उबग न मानावा चतुरें । स्वामीचरित्र म्हणोनी ।।४५।। जयजयाजी परमानंदा । वैकुंठवासी श्रीगोविंदा । भक्ततारका आनंदकंदा । अनामातीता अभेदा ।।४६।। अरिमर्दना सर्वेशा । विश्वंभरा अविनाशा । पुराणपुरूषा अनंतवेशा । भवपाशा सोडवी ।।४७।। जयजयाजी कमलासना । कमलावरा कमलनयना । विधिताता

कमलवदना । हृदयकमलीं वसावें ।।४८।। मच्छ कूर्म वराह जाण । नृसिंह आणि वामन । परशुराम दशरथनंदन । कृष्ण बौध्द कलंकी तूं ।।४९।। स्वामीचरित्र सुंदर उद्यान । त्यांतील कुसुमें वेंचून । सुंदर माळा करोन । आला घेवोन विष्णुकवि ।।५०।। आपुल्या कंठीं तत्काळ । घालोनि चरणीं ठेविला भाळ । सदोदित याचा प्रतिपाळ । करावा बाळ आपुले ।।५१।। इति श्रीस्वामीचरित्रसारामृत । नाना प्राकृत कथा संमत । सदा परिसोत भाविक भक्त एकविंशोऽध्याय गोड हा ।।५२।। श्री स्वामीचरणार्पणमस्तु ।। शुभं भवतुं ।।

।। इति ''श्री स्वामीचरित्रसारामृत'' समाप्त ।।

॥ श्री स्वामी समर्थ ॥